सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - ३ रे | अंक २३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### काँग्रेस जिल्हाध्यक्षांचे अपहरण करुन मारहाण



**अहिल्यानगर :** नगर जिल्ह्यातील श्रीरामपूरमध्ये आज सकाळी घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे राजकीय वातावरण तापलं आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांचे अपहरण करून मारहाण केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेला आरोप-प्रत्यारोपाचा सिलसिला आता प्रत्यक्ष हिंसाचारात उतरल्याचे चित्र दिसून आले आहे. या घटनेनंतर काँग्रेस आक्रमक झाला असून कार्यकर्त्यांनी आंदोलन करत संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणातील दोषींना अटक करून कारवाईची मागणी काँग्रेसने केली आहे. संबंधित व्यक्ती हिंदुत्ववादी संघटनेशी संबंधित असल्याचा आरोप केला जात आहे.

### ३४ किलो गांजा काटोलमध्ये केला जप्त

**नागपूर :** नागपूर पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी कारवाईला पुन्हा एकादा यश आले आहे. नागपूरच्या काटोलमध्ये ३४ किलो गांजा जप्त करण्यात आला असून एनडीपीएस पथक व काटोल पोलिसांनी हि संयुक्त धडक कारवाई केली आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोलमध्ये अमली पदार्थविरोधी पथक आणि काटोल पोलिसांनी संयुक्त रित्या केलील्या कारवाईत तब्बल ३४ किलो गांजा जप्त करून सह जणांना अटक केली आहे.

### लग्नातच नवरदेवाचा हृदयविकाराने मृत्यू

**अमरावती :** लग्नसोहळ्यातच नवरदेवाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालाय. अमरावतीच्या वरुड तालुक्यातील पुसला गावात ही घटना घडलीय. लग्नानंतर अवघ्या अर्ध्या तासातच नवरदेवाला हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्याला तातडीनं रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. त्यामुळे वधु-वराच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय.

# विश्रांतवाडी परिसरात सापडल्या जिलेटिन कांड्या

## ■ पुणे हादरलं! पोत्यात सापडल्या संशयास्पद वस्तू

**पुणे :** पुण्यातील विश्रांतवाडी-टिंगरेनगर परिसरात एका घटनेमुळे नागरिकांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. विद्यानगर गल्ली नंबर ८, साईकृपा लॉजजवळ मोकळ्या जागेत काही संशयास्पद वस्तू आढळल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही जणांकडे बॉम्बेसाठी वापरल्या जाणाऱ्या जिलेटिनच्या कांड्या सापडल्याने मोठी खळबळ उडाल्याचं पहायला मिळालं आहे.





सफाई कर्मचारी नेहमीप्रमाणे आपले काम करत असताना त्यांना मोकळ्या प्लॉटलगत एका पोत्यात काही वस्तू दिसल्या. बॉम्बमध्ये वापरल्या जाणाऱ्या जिलेटिन कांड्या आणि वायरसारखे हे साहित्य असल्याने त्यांनी जराही वेळ न घालवता पोलिसांना बोलावले. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिसराची नाकाबंदी केली.

या प्रकरणी दोन मजुरांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याविरोधात पुण्यातील विश्रांतवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिलेटिन कांड्या बेकायदेशीरपणे जवळ बाळगल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर हे साहित्य नेमके कशासाठी वापरले जात होते, याचा खुलासा झाला. प्राथमिक माहितीनुसार, हे जिलेटिन खडक फोडण्यासाठी वापरले जात होते आणि ते बांधकाम करणाऱ्या मजुरांकडे आढळून आले. पण पोलिसांनी इतर अँगलने देखील चौकशी सुरू केली आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी उत्तराखंड पोलिसांनी अल्मोरा येथील एका सरकारी शाळेच्या परिसरातून १६१ जिलेटिनच्या कांड्या जप्त करण्यात आल्या आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात शक्तिशाली स्फोटके आढळून आल्याने खळबळ उडाली असून परिसरात सुरक्षा कडक करण्यात आली होती.

# गरवारे कॉलेज चौकात अपघात; गाडीचा चुराडा!

**पुणे :** पुण्यामध्ये मध्यरात्री अपघातांची मालिका सुरूच असून, गरवारे कॉलेज चौकातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भरधाव वेगामुळे झालेल्या या दुर्घटनेने पुन्हा एकदा वाहतूक नियमांविषयी गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या अपघातामध्ये दोन व्यक्ती गंभीर जखमी झाल्या असून, एका चारचाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होताना दिसत आहेत.

हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास गरवारे कॉलेज चौकात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एक भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने रस्त्यावर धावणाऱ्या चारचाकी कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, चारचाकी कार जागेवरच पलटी झाली. या अपघातात दुचाकीवरील दोन जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. तसेच दुचाकीचा देखील चुराडा झाला आहे.

या अपघातात कार चालकही किरकोळ जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेतली असून अपघाताला नेमके कोणते कारण जबाबदार होते, याचा तपास सुरू आहे. रात्रीच्या वेळी अति वेगाने वाहन चालवल्याने अशा प्रकारच्या घटना शहरात वाढत आहेत. दरम्यान, भरधाव वेगामुळे झालेल्या या दुर्घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले असून, पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने नोंद घेऊन तपास सुरू केला आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून तपास सुरू करण्यात आलाय.

# जेवणातून विषबाधा; २८ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

## छत्रपती संभाजीनगरमधील धक्कादायक प्रकार

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणात मृत पाल आढळून आली आहे. एक नंबरच्या मेसमध्ये गवारच्या भाजीमध्ये विद्यार्थ्यांच्या ताटात ही मृत पाल आढळली. यामुळे ज्यांनी जेवण केले होते त्यांना उलट्या आणि मळमळीचा त्रास सुरू झाला. त्यानंतर २८ विद्यार्थ्यांना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

### समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील प्रकार



या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन करत सहायक आयुक्त यांना वसतिगृहात बोलावले. या वेळी सहायक आयुक्त यांनी ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले.

यापूर्वीही मेसमध्ये सडकी फळं दिल्याच्या, पोह्यामध्ये झुरळ, अळ्या आढळून आल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या होत्या मात्र त्याची दखल घेतली जात नसल्याचा आरोप या विद्यार्थ्यांनी केलाय.

यापूर्वी देखील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर मध्ये मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात देण्यात येणाऱ्या जेवणात किडे निघाल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या या मुलींनी जेवण न करता तहसील कार्यालय गाठून तहसीलदाराकडे तक्रार दिली. ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी याकरिता शासनाने वस्तीगृह सुरू केले मात्र याच वस्तीगृहामध्ये देण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या जेवणात किडे निघत आहे, तर, या मुलींना सडके फळ देण्यात येत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार तक्रार करूनही या प्रकरणाची कोणी गांभीर्याने दखल घेत नसल्याने विषबाधा ही होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मुली आणि पालक संतप्त झाले आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकरणी आता समाज कल्याण विभाग काय कारवाई करणार असा सवाल उपस्थित होतोय.



# तरुण भारत परिवार मला माझ्या 'माई' कुटुंबासारखाच वाटतो : ममता सपकाळ

**त. भा. वृत्तसेवा**

**सोलापूर :** प्रसिद्ध समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांनी सोलापूर येथील 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी तरुण भारत परिवार मला माझ्या 'माई' कुटुंबासारखाच वाटतो अशी आत्मिक भावना व्यक्त केले.

मुख्य संपादक प्रशांत माने यांनी ममताताईंचा व विनय सिंधुताई सपकाळ यांचा बुके, तरुण भारतच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या राष्ट्रयज्ञ के १०० वर्ष विशेषांक आणि सोलापूरी चादर देऊन कौटुंबिक सत्कार केला.

याप्रसंगी मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, मुख्य उपसंपादक अजितकुमार संगवे, धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, शिवाजी नाईट महाविद्यालयाचे दत्ताभाऊ भोसले, प्रतिभा झाडे, सत्यम गायकवाड, सागर पवार, रंजना घोडके, वैशाली कांबळे, अमोगसिद्ध मुंजे, श्रीनिवास गाजूल, नागसेन शिवशरण आदी उपस्थित होते. भेटीदरम्यान ममता सपकाळ यांनी तरुण भारत प्रेसच्या सर्व विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांची कार्यप्रणाली जाणून घेतली. संपादकीय, छपाई, वितरण आदी विभागांमध्ये त्यांनी पत्रकार व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

**प्रसिद्ध गजलकारा ममता सिंधुताई सपकाळ यांची सोलापूर 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट**

संपादकीय टीमच्या संवादप्रसंगी माईंच्या संस्थेद्वारा आजही तेच काम मोठ्या हिमतीने सुरु आहे जे माईंनी केले होते, समाजकार्य, महिला सक्षमीकरण आणि गरजू-अनाथ मुलांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांवर त्यांनी माहिती दिली. माध्यमांनी समाजातील सकारात्मक आणि रचनात्मक कार्यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

तरुण भारतच्या प्रतिनिधींनी ममताताई सपकाळ यांच्या कार्याचे कौतुक करून सामाजिक परिवर्तनासाठी माध्यमे आणि सामाजिक संस्था यांनी एकत्र काम करण्याची गरज व्यक्त केली. या सदिच्छा भेटीमुळे परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ झाली असून भविष्यात माईंचे सेवाकार्य आणि विविध सामाजिक उपक्रमांत संयुक्त प्रयत्न वाढण्याची आशावाद व्यक्त करण्यात आला.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यातून उद्यानांचा विकास : आयुक्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शहरातील ग्रीन बेल्टमध्ये उद्यानांचा विकास करण्याची संकल्पना मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी मांडली.विविध संस्थानी त्यास पाठबळ दिले असून यामुळे शहरात आता उद्यानांचा विकास गतीने होणार आहे.

नागरिकांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी शहरात उद्याने असणे गरजेचे आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी देखील उद्यानांची आवश्यकता आहे. त्यामुळे शहरात उद्याने विकसित करण्यासाठी काय करता येईल? याची आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी विविध ग्रीन बेल्टला भेटी देऊन पाहणी केली.या जागेवर उद्याने विकसित करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. ही कल्पना मांडताच स्वयंसेवी संस्थानी त्यास पाठबळ व्यक्त केले.मनपाने त्यांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या माध्यमातून शहरात एकूण ७ ग्रीन बेल्ट विकसित केले जाणार आहेत.मनपा स्वतः ३ ग्रीन बेल्ट विकसित करणार आहे. यामुळे आगामी काही दिवसात शहरातील ग्रीन बेल्ट मध्ये उद्याने विकसित झालेली दिसून येणार आहेत.त्यामुळे शहरातील पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होणार असून शहराचा चेहरा-मोहरा बदलला जाणार आहे.



# लातूर शहरातील कारंजे बनले शोभेच्या वस्तू!






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूर शहरातील तापमानातबदल व्हावा, वातावरणातील शुष्कता कमी व्हावी या उद्देशाने शहराच्या विविध भागात उभारण्यात आलेले अनेक कारंजे बंद पडले असून मुख्य रस्त्यावरील तहसिल कार्यालय, महात्मा गांधी चौक, महानगरपालिका कार्यालयापाठीमागीलनाना - नानी पार्क समोरील कारंजेही अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचे पाहावयासमिळते. याकरिता मनपाचालाखोंचा निधी खर्च करण्यात आला असून कारंजे कालांतराने बंद पडणार असतील तर ती उभारण्यातचका आली ? असा सवाल लातूरच्या सुजाण नागरिकांतूनकेला जात आहे.

शहराच्या सौंदर्यात भर टाकण्याच्या दृष्टीने तसेच वातावरणातील शुष्कता, आर्द्रता कमी करण्याकरिता शहराच्या अनेक भागात शोभेचे कारंजे सुरु करण्यात आले होते. त्याकरिता मुख्य ठिकाणी आकर्षक कठडे, त्यावर विद्युत रोषणाईची सोयही करण्यात आली होती. जेव्हा ही कारंजे सुरु केली गेली तेव्हा काही काळ लातूरच्या सौंदर्यात निश्र्चित भर पडली. हवेतील धुळीचेकण कमी करण्याकामीहीया उपक्रमाचा लाभ होईल असे सांगितले गेले होते. काही दिवस चालू राहिल्यानंतर पुन्हा कारंजे बंद पडले. नाही म्हणायला आता राजीव गांधी चौकातील राजीव गांधी यांच्या पुतळ्याजवळील कारंजे चालू अवस्थेत दिसतात. गांधी चौकातील कारंजे मागच्या अनेक दिवसांपासून बंद पडले आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने हाती घेण्यात आलेले असे अनेक उपक्रम सुरुवातीचे काही दिवस चालू ठेवले की ते पुन्हा बंद पडल्याची अनेक उदाहरणे आहेत. काही वर्षांपूर्वी शहरातील दुभाजकांच्या सुशोभिकरणाचाही उपक्रम हाती घेण्यात आला होता. त्याची जबाबदारी काही संस्था - संघटनांवर सोपविण्यात आली होती. संबंधित संस्थांनी आपल्याला नेमून दिलेल्या परिसरात स्वच्छता ठेवण्यासोबतचआपली जाहिरातहीकेली होती. मनपातील स्थायी समितीच्या सभेत याबाबतचानिर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी स्थायी समितीच्या सभापतिपदीभारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अशोक गोविंदपूरकर हे विराजमान होते. त्यांच्या दूरदृष्टीतून मनपाचानिधी खर्च न होता, इतर संस्था - संघटनांचे सहाय्य घेऊन शहर सुशोभित करण्याचा त्यांचा मनोदय होता. मनपा प्रशासनाने शहराच्या सुशोभिकरणासाठी प्रशासकाच्या काळातहीहा उपक्रम चालू ठेवायला काहीचहरकत नव्हती. त्यामुळे किमान शहराच्या सौंदर्यात बाधा आली नसती. कारंज्यांच्याबाबतीतहीमनपा प्रशासनाने हाचनिर्णय घेऊन ती नियमित चालू ठेवली असती तर शहराच्या बकालपणात बऱ्याच प्रमाणात घट झाली असती. एकंदर परिस्थितीतविद्यमान परिस्थितीत लातूर शहरातील कारंजे शोभेच्या वस्तू बनल्या आहेत, हे मात्र खरे.

# केवळ वळण रस्त्यालगतच नव्हे तर शहराच्या भरवस्तीतही टाकला जातोय उघड उघड कचरा

## लातूरच्या अस्वच्छतेचे विदारक चित्र; समोर दिसत असूनही मनपा प्रशासन बनतेय अनभिज्ञ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूर शहरातील विविध भागात असणाऱ्या स्वच्छतेचे चित्र मनपा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न होऊनही अद्याप त्याबाबत प्रशासनात जागृती झाल्याचे दिसत नाही. मागच्या तीन साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात पदाधिकाऱ्यांशिवाय काम करण्याची सवय लागलेल्या मनपा प्रशासनाला शिस्त येणार तरी केव्हा आणि नागरी समस्यांची पोटतिडकीने सोडवणूक होणार तरी केव्हा? असा आर्त टाहो फोडण्याची पाळी आता लातूरकरांवर येऊन ठेपल्याचे पाहावयास मिळत आहे. शहरालगतच्या वळण रस्त्यासोबतच आता शहरातील भर वस्तीतही कचरा टाकला जात असल्याचे चित्र पाहायला मिळते.



लातूर शहराला मागच्या काही काळापासून विविध समस्यांनी जणू व्यापून टाकले आहे. आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी सामान्य नागरिकांनी महापालिकेत कितीही खेट्या मारल्या तरी त्यावर कोणताही निर्णय वेळेत घेतला जात नसल्याचे सर्वज्ञात आहे. सगळ्यात महत्वाचा प्रश्न नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे. शहर व शहराचा परिसर स्वच्छ असेल तरच नागरिक आरोग्यदृष्टया सदृढ राहू शकणार आहेत. शहराच्या विविध भागात कचरा नेण्यासाठी घंटा गाड्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नागरी वस्त्यातील कचरा एखाद दिवसाचा अपवाद वगळता उचललाही जातो. परंतु अनेक भागात घंटा गाड्या फिरकतही नाहीत. कंत्राटी पध्दतीमुळे असे प्रकार आता वारंवार घडताना दिसत असल्याचे बोलले जाते.

लातूर शहराच्या चारही बाजूंच्या वळण रस्त्यावर सगळीकडे मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याची बाब काही नवीन नाही. याबाबत माध्यमांनी अनेकदा मनपाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करूनही काही उपयोग झाल्याचे दृष्टीपथास येत नाही. प्लास्टिकचा कचरा, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, अन्य प्लास्टिकचे साहित्य असा कधीही नष्ट न होणारा आणि पर्यावरणाला बाधक असणारा कचरा शहराच्या अनेक भागात इतस्ततः विखुरलेला पाहावयास मिळतो. वळण रस्त्यावर तर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगच्या ढीग पडलेले पाहायला मिळतात. वास्तविक पाहता वळण रस्ते वस्तीपासून दूर असल्याने नागरिक त्याचा वापर मोकळ्या हवेत फिरण्यासाठी, हवापालटासाठी करण्याची मनीषा बाळगून असतात. पण, दुर्दैवाने सामान्य नागरिकांची ती मनीषाही मागच्या अनेक वर्षांपासून पूर्ण होताना दिसत नाही. कारण अशा प्रकारचा कचरा टाकला जात असल्याने वळण रस्ते आता दुर्गंधीची भांडारे बनताना आढळून येतात. वळण रस्त्यावरून जाताना लोकांना आता शहराच्या एखाद्या बकाल वस्तीतून जाताना ज्याप्रमाणे नाकाला रुमाल लावून जावे लागते, तसे जावे लागताना दिसतेय.

शहरातील मोक्याच्या ठिकाणी अगदी शाळा - महाविद्यालयांसमोरील रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला दिसतो. रस्त्यालगत कोठेही म्हणजे एखादा कोपरा वा विजेच्या खांबाजवळील मोकळ्या जागेत खुलेआम कचरा टाकला जात असल्याचे दिसून येते. अगदी उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास शहरातील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाजवळील महात्मा बसवेश्र्वरांच्या पुतळ्यालगतच्या जागेत तसेच उस्मानपुऱ्यातून मनपा कार्यालयाकडे जातानाच्या कोपऱ्यावरील मनपा कॉम्प्लेक्सच्या जवळही असाच कचरा टाकण्यात येत असल्याचे वारंवार दिसून येते. लातूरच्या अस्वच्छतेचे हे विदारक चित्र अनेकांच्या काळजीत भर टाकणारे आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने आता अगोदर ज्याप्रमाणे शहराच्या अनेक भागात कचरा कुंड्या उपलब्ध करून दिल्या जात असत, त्याप्रमाणे नजीकच्या काळात कोठेही कचरा टाकण्याची नागरिकांची सवय बंद करण्यासाठी कचरा कुंड्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# केशवराज'मध्ये विविध उपक्रमांनी संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाची प्रत यांच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या तथा भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या सदस्या डॉ. शैलजा हासबे, भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या राष्ट्रीय सदस्या अनघा अंधोरीकर, भारतीय स्त्रीशक्तीच्या शाखा लातूरच्या उपाध्यक्षा प्रेमा बाहेती, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी विषय मांडणी करताना प्रमुख वक्त्या शैलजा हासबे यांनी संविधानाची रचना सांगितली. विद्यार्थ्यांना संविधानातील आपल्या कर्तव्यांची ओळख करून दिली. देशाचे उत्तम नागरिक म्हणून जबाबदारीने कार्य पार पाडावे, स्वच्छतेची नैतिक जबाबदारी पार पाडावी, राष्ट्रीय मालमत्तेचा आदर करावा, महिलांचा आदर करावा, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येकापर्यंत शिक्षण पोहोचावे, अशा अनेक कर्तव्यांची माहिती याप्रसंगी त्यांनी दिली.




याप्रसंगी विद्यालयातली इ. ९ वी अ वर्गातील विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच शासन परिपत्रकानुसार संविधान दिनानिमित्त विद्यालयात संविधान प्रभात फेरी, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला प्रदर्शनी, मानवी साखळी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी यांनी केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी 'यह कल कल छल छल बहती गंगा धारा' हे देशभक्तीपर गीत सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वनमाला कलुरे यांनी केले तर विष्णू इरळे यांच्या संविधानाच्या उद्देशिकेने कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका गिरी, श्रीमती तेजस्विनी सांजेकर, अश्विनी स्वामी, संविधान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे प्रमुख व्यंकटेश माने, प्रयागराज गरुड, अशोक रायते, अमोल गायकवाड, सुवेद सूर्यवंशी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लातुरात अभिजात इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरा अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सव दि.१६, १७ व १८ डिसेंबर २०२५ रोजी लातूर येथील दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

गतवर्षीप्रमाणे याही वर्षी चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने या महोत्सवातील विजेत्या लघुपटास प्रथम पारितोषिक देण्यात येणार असून लघुपट निर्मितीच्या इतर एकूण २५ विभागात वेगवेगळी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत माहितीपट, ॲनिमेशन आणि व्हिडीओ साँग्सचा देखील समावेश असणार आहे.

यंदा भारत, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, जर्मनी, स्पेन, इटली, रशिया, मलेशिया, कॅनडा, ऑस्ट्रिया, सौदी अरेबिया आणि इराण इ. देशातून मराठी, हिंदी, इंग्रजी, मालवणी, तेलुगू, तमिळ, बंगाली, कन्नड, आसामीस, मल्लूयाळम, पंजाबी, राजस्थानी, इटालियन, जर्मन, टर्किश, स्पॅनिश, चायनिज (कँटोनीज), रशियन, कॅटलन, फ्रेंच या भाषांमधून सुमारे २५० लघुपटांनी सहभाग नोंदवलेला असून यातील निवडक ८० लघुपट या महोत्सवात दाखवण्यात येणार आहेत. या महोत्सवाचे परिक्षक म्हणून संतोष पाठारे आणि रघुनाथ फडणीस हे ज्येष्ठ समीक्षक काम बघणार आहेत.

या महोत्सवात लघुपट निर्मिती तंत्राबरोबरच इतर विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने व परिसंवाद देखील होणार आहेत. लघुपटनिर्मितीसाठी इच्छुक लेखक-दिग्दर्शकांसाठी निर्मिती सहकार्य करण्यासाठी व त्यांच्या संकल्पनांना पाठबळ देण्यासाठी 'पीच टँक' हा आगळा उपक्रम यानिमित्ताने राबवण्यात येणार आहे. निःशुल्क असलेल्या या महोत्सवाचा लातूरकर रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीचे जितेंद्र पाटील, प्रा डॉ. विश्र्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख आणि धनंजय कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लातुरात संविधान सन्मान भव्य ५०० फूट तिरंगा रॅली संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्ष आणि संविधान दिना निमित्त संविधान सन्मान समिती, यांच्या वतीने शहरात भव्य ५०० फूट लांबीच्या संविधान सन्मान तिरंगा ध्वज रॅलीचे आयोजन करण्यात आले. पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेली ही रॅली उत्साहात आणि देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत भरलेली होती.

रॅलीचा शुभारंभ भिक्खू पय्यानंद थेरो, भंते बोधिराज, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना, तसेच समाज कल्याण उपायुक्त अविनाश देवसटवार सह आयुक्त यादव कांबळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून होत संविधान चौक येथे समारोप करण्यात आला. शहरातील विविध विद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी पथनाट्य, झांज पथक, तसेच महापुरुषांच्या वेशभूषेत आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून रॅलीला विशेष






रंगत आणली. ५०० फूट तिरंग्याखाली निघालेली ही रॅली नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.

संविधान चौकात बोलताना पु.भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले, या अमृत महोत्सवी वर्षात आपण सर्वांनी एकच संकल्प करायला हवा भारतीय संविधानावरील निष्ठा कधीही ढळू देणार नाही, संविधानातील मूल्ये आपल्या आचरणात आणू, आणि प्रत्येक नागरिकापर्यंत संविधानाची जागृती पोहोचवू. शासनानेही संविधान वर्ष अधिक व्यापक पातळीवर जनसहभागातून साजरे करावे, संविधानाचे महत्त्व घरोघरी पोहोचवावे व युवकांना लोकशाही मूल्यांची भक्कम जाण निर्माण करून द्यावी. आजची रॅली हा त्याच जागृतीचा एक सुंदर प्रारंभ आहे. आपण सर्वजण संविधानाचे संरक्षक आहोत आणि ही जबाबदारी अभिमानाने पार पाडली पाहिजे.

रॅलीचा समारोप संविधान चौकात संविधान उद्देशिका वाचन आणि राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड यांनी केले, तर आभार निलेश बनसोडे यांनी मानले.या रॅलीमध्ये कालिदास माने, बसवंत उबाळे, सुशील चिकटे, डॉ विजय अजनीकर, अशोक देडे, शोभा सोनकांबळे, आशा चिकटे, विशाल वाहुळे, प्रा सतिश कांबळे, उत्तम कांबळे, सुरेश सोनकांबळे मिलिंद धावारे, आदीजन शहरातील विविध क्षेत्रातील विविध शाळांचे विद्यार्थी, संविधानप्रेमी नागरिक, तसेच महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पं. मुकेश जाधव यांना यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूरचे सुपुत्र, जागतिक ख्यातीचे तबलावादक आणि पंडित शांताराम चिगरी गुरुजींचे पट्टशिष्य पंडित मुकेश जाधव यांना यावर्षीचा यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. अंबाजोगाई येथे आयोजित यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात उद्या दि. २७ नोव्हेंबर रोजी या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रात तबला वादनाच्या माध्यमातून पं. मुकेश जाधव यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विविध देशात त्यांनी तबला वादनाचे असंख्य कार्यक्रम सादर करून भारतीय संगीताची पताका उंचावली आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत प्रतिष्ठेचा हा पुरस्कार प्रदान होत असल्याचे आयोजकांनी सांगितले. समारोहात पुरस्कार वितरणानंतर रात्री ८ वाजता पंडित मुकेश जाधव यांचे स्वतंत्र तबला वादन आयोजित करण्यात आले आहे. संगीतप्रेमींसाठी हा अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

पंडित मुकेश जाधव यांचा गौरव होत असल्याबद्दल डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. अंगद गायकवाड, सोनू डगवाले, संजय सुवर्णकार, मीनाक्षी कोळी व विजय श्रीमंगले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. या समारोहाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे आयोजक दगडू लोमटे यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### आसिफ शेख यांची कुटुंबासह उमराह यात्रा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ नोव्हेंबर :** भारतीय टेलिव्हिजनवरील बहुगुणी कलाकार आणि 'भाबीजी घर पर है'मधील विभुती नारायण मिश्रा या भूमिकेमुळे घराघरात लोकप्रिय असलेले आसिफ शेख यांनी अलीकडेच कुटुंबासोबत उमराह यात्रा पूर्ण केली. त्यांच्या मते, हा अध्यात्मिक प्रवास जीवनातील अत्यंत शांत आणि कृतज्ञतेने भरलेला अनुभव ठरला. ते सांगतात, गेल्या वर्षी एकटे उमराह केल्यानंतर कुटुंबासह जाण्याचे स्वप्न होते आणि यंदा ते अनपेक्षितरीत्या पूर्ण झाले. मक्का आणि मदिनामध्ये एकत्र प्रार्थना, चालणे, संवाद आणि चिंतन करत घालवलेला वेळ त्यांच्या मते अविस्मरणीय ठरला. घरात असूनही क्वचितच मिळणारा कौटुंबिक वेळ या यात्रेमुळे अर्थपूर्णरीत्या अनुभवता आला. प्रेक्षकांना त्यांचा विनोदी अवतार पाहण्यासाठी– 'भाबीजी घर पर है', सोमवारी ते शुक्रवारी, रात्री १०.३० वाजता, एण्ड टीव्हीवर प्रसारित होते.

### माधवी भोसलेच्या भूमिकेत उत्कर्षा नाईक

**मुंबई :** कौटुंबिक नात्यांचे हृदयस्पर्शी चित्रण करणारी सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' ही मालिका प्रेक्षकांना खूप आवडली आहे. या मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुण मुलीची कहाणी आहे, जिने आपले आयुष्य अनेक अडचणींमधून मार्ग काढून आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी समर्पित केले आहे. आपल्या वडिलांच्या (सुहास– वरुण बडोला) व्यसनापासून ते आपला प्रियकर विराट (रजत वर्मा) आणि बालपणीचा मित्र संजय (ऋषी सक्सेना) यांच्याशी असलेल्या आपल्या नात्यापर्यंत तिचा झगडा सुरू आहे.

### विद्यार्थ्यांनी जनाटिक्स ऑटोमेशन स्किल चॅलेंज २०२५ मध्ये चमकदार कामगिरी केली

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज घोषणा केली की, त्यांच्या टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) च्या विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठित जनाटिक्स ऑटोमेशन स्किल चॅलेंज २०२५ मध्ये प्रथम व द्वितीय स्थान पटकावले आहे. पुण्यातील जेएस–पीएम कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग येथे १२ व १३ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेला हा दोन–दिवसीय इव्हेण्ट उदयोन्मुख ऑटोमेशन टॅलेंटसाठी सर्वात मोठे राष्ट्रीय व्यासपीठ आहे. या स्पर्धेमध्ये भारतभरातील २००० हून अधिक इंजीनिअरिंग, डिप्लोमा व आयटीआय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### इंटरसिटी बस बुकिंगमध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा

**मुंबई :** रेडबस या जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बस तिकिटिंग व्यासपीठाने नुकताच त्यांचा बसट्रॅक रिपोर्ट हा अहवाल सादर केला. एप्रिल ते सप्टेंबर २०२५ या काळात महाराष्ट्राने संपूर्ण देशात आंतरशहर प्रवासाच्या संदर्भात सर्वाधिक वाटा असलेली डिजिटल बाजारपेठ अशी आपली ओळख निर्माण केली आहे. राष्ट्रीय स्तरावरील बस सीट बुकिंग्समध्ये १६ टक्के वाट्यासह या बाजारपेठेने दमदार आंतरशहर कनेक्टिव्हिटी, प्रवाशांचे बदलणारे वर्तन आणि प्रवासाचे नवे ट्रेंड स्थापित केले आहेत. या कालावधीत महाराष्ट्र सातत्याने भारतातील आघाडीच्या आंतरशहर प्रवास केंद्रांच्या यादीत होता. मुंबई, पुणे, नागपुर, नाशिक आणि औरंगाबाद या शहरांमधील दमदार मागणीमुळे हे शक्य झाले आहे.

### पैठणमध्ये काँग्रेस–राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची युती

**पैठण, दि. २४ नोव्हेंबर :** नगरपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीतून शिवसेना ठाकरे गटाशी युती न करता डच्चू देण्यात आल्याची माहिती पैठण तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनोद तांबे यांनी पत्रकार परिषद मध्ये दिले आहे. पैठण नगरपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडी कडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना युती संदर्भात अनेक वेळेस प्रयत्न करून देखील या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाकडून नगराध्यक्ष पदासाठी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता स्वयंघोषित उमेदवार दिल्यामुळे. महाविकास आघाडीने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार संजय वाघचौरे यांच्यासोबत दोन्ही पक्ष आघाडीमध्ये हंगामी निवडणूक लढवणार असल्याचा निर्णय पत्रकार परिषद मध्ये काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनोद तांबे यांनी जाहीर केला असून यावेळी. राष्ट्रवादीचे माजी आमदार संजय वाघचौरे, पैठण काँग्रेस शहराध्यक्ष निमेष पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष उमेश पंडूरे यांच्या प्रमुख उपस्थिती होती.

### शेतकऱ्यांच्या मदतीला आता महाविस्तार ॲप

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ नोव्हेंबर :** शेतकऱ्यांना हवामानातील बदल, बाजारपेठेतील अस्थिरता आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून कृषी विभागाने 'महाविस्तार' हे एआय प्रणालीवर आधारित ॲप विकसित केले आहे. पवर शेतकऱ्यांसाठी मराठी माषेतील चॅटबॉट देण्यात आला असून या चॅटबॉटला शेतकरी प्रश्न विचारू शकतात, त्याची उत्तरे चॅटबॉट काही सेकंदात शेतकऱ्याऱ्यांना देतो. मातीपासून मार्केटपर्यंत आता सगळं काही एका ठिकाणी महाविस्तार पच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे विभागातील सर्व शेतकरी बांधवांनी महाविस्तार ॲप मधून इन्स्टॉल करून वापर करण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

### वेदश्री तपोवनात गीता जयंती महोत्सवाचे आयोजन

**पुणे :** वेदश्री तपोवन कार्य समितीसह सहयोगी संस्थांतर्फे श्रीमद् भगवद्गीता जयंती निमित्त तीन दिवसीय गीता जयंती महोत्सव आळंदीत आयोजित करण्यात आला आहे. आळंदी मोशी येथील वेदश्री तप–ोवन येथे दि. २९, ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे यजमान पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक आणि महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी श्री अभय सुरेशकुमार भुतडा हे आहेत.या निमित्ताने गीता परिवारातर्फे पुणे जिल्हा स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन दि. २२ ते २७ नोव्हेंबर २०२५ या काळात केले आहे. विजेत्यांना पारितोषिके महोत्सवातच प्रदान केली जातील.महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता ब्रह्मचारी हनुमान चैतन्य महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. यावेळी श्रीराम जन्मभूमि न्यास अयोध्या चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज उपस्थित राहणार आहेत. तर, सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा असून या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि आळंदीचे ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव हे उपस्थित राहणार आहेत.

### अजिंठा लेणीला ३० देशांच्या प्रतिनिधींची भेट

**फर्दापूर, दि. २३ नोव्हेंबर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी तीस देशांमधील कलाकार, तज्ज्ञ आणि प्रतिनिधी लेणी पाहण्यासाठी आले होते छत्रपती संभाजीनगर येथे सोपानच्या मोठ्या सांस्कृतिक उपक्रम या तीन दिवसांच्या कार्यक्रम हा सुरू असुन हा कार्यक्रम वेरूळ, छत्रपती संभाजीनगर तसेच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी या युनेस्को हेरिटेज स्थळांमध्ये यशस्वीरित्या पूर्ण झाला या शेवटचा कार्यक्रम जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये पार पडला यावेळी या उपक्रमात कला सांस्कृतिक विरासत कूटनीती आणि श्र्वासताचा सुंदर संगम सादर केला गेला जगभरातील कलाकार इतिहासकार सांस्कृतिक तज्ज्ञ आणि राजनैतिक प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाले.

# लोकसंगीताने जिंकली रसिकश्रोत्यांची मने!

## एआययु ३९ व्या युवा महोत्सवात रंगले विविध लोकपरंपरांचे मंत्रमुग्ध सादरीकरण







**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ नोव्हेंबर :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडच्या विविध विद्यापीठांच्या विद्यार्थी कलावंतांनी जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे लोकसंगीताचा बहुरंगी जल्लोष उधळला. पारंपरिक वाद्यांची नादमधुर साथ, प्रादेशिक लोकपरंपरांचा आवाज आणि रंगीबेरंगी पोशाखांनी सजलेल्या या सादरीकरणांनी रसिकांचे मन मोहून टाकले.

इंदोरच्या देवी अहिल्या विश्वविद्यालयाने उत्तर भारतातील पहाडी धून आणि महाराष्ट्राच्या तालाची सुंदर सांगड घालत डफ, नगाडा, डमरू, नाळ, मंजीरे, हार्मोनियम आणि बासरीसह प्रभावी लोकसंगीत सादर केले. कोणतेही गीत न वापरता फक्त धून आणि तालवाद्यांचा खेळ प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारा ठरला.

राजीव गांधी प्रौद्योगिकी विश्वविद्यालय, भोपाल यांच्या पथकाने नर्मदा मायेशी संबंधित बंबलिया परंपरेचा लोकध्वनी ढोलक, नगाडिया, झांज, बासरी आणि इतर वाद्यांसह रंगवला. बुंदेलखंड–महाकौशल या प्रदेशाचा संस्कृतीस्वर त्यांच्या सादरीकरणातून स्पष्टपणे उमटला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मराठमोळ्या वेशभूषेत अध्यात्मिक गीत, गवळण, लावणी, भक्तीगीत, आदिवासी गीत आणि भारूड अशा विविध लोकसंगीत प्रकारांचा प्रभावी संगम घडवला. बासरी, संबळ, ढोलताशा, हालगी, ढोलकी, मृदंग, एकतारी, तुण–तुणे, तारपा अशा वाद्यांनी लोकसंगीताला खास मराठी रंग दिला.

छत्तीसगडच्या इंदिरा कला संगीत विद्यापीठ, खैरागढ यांच्या पथकाने ३५ पेक्षा जास्त वाद्यांसह कर्मा, गौरा गौरी, जस गीत, राऊत नाचा आणि सुवा गीतांच्या धून एकामागोमाग मांडल्या. पारंपरिक कुर्ता–धोती आणि साफ्यातील कलाकारांनी छत्तीसगडी लोकसंस्कृती रंगतदार शैलीत सादर केली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ६० पेक्षा अधिक वाद्यांचा भव्य फोक ऑर्केस्ट्रा सादर करत महाराष्ट्रातील लावणी, भारूड, आदिवासी नृत्य, भूपाळी ते अंगाईपर्यंत अनेक लोकप्रकार एकाच सादरीकरणात गुंफले. दमदार तालवाद्यांच्या नादात महाराष्ट्राचा मातीचा आवाज दिमाखात दुमदुमला. पं. रविशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगड पथकाने नाचा, गौरा पंथी, बास गीत आणि पंथी नृत्यपरंपरांच्या धून मांडत छत्तीसगडची लोकपरंपरा जिवंत केली. बेंजो, बासरी, शहनाई आणि मंजिरा यांच्या सुरावटींनी सादरीकरणाला स्थानिक रंगत दिली. ए.के.एस. विद्यापीठ, सतना, मध्यप्रदेश यांनी तुतारी, ढोल, ढोलकी, शहनाई, नगारा आणि ताशांच्या नादात पारंपरिक पगडीसह आकर्षक फोल्क ऑर्केस्ट्रा सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. तर रवींद्रनाथ टागोर युनिव्हर्सिटी, मध्यप्रदेश यांनी ढोलकी, मृदंग, बासरी आणि झांज–मंजिर्यांच्या साथीत राज्याच्या समृद्ध लोकपरंपरेची झलक सादर करत प्रेक्षकांना मोहित केले. विविधतेने नटलेली ही लोकसंगीताची मैफल युवा महोत्सवातील एक अविस्मरणीय ठरली. विविध राज्यांच्या लोकसंस्कृतींना एकत्र आणत, संगीताच्या सुरावटीतून 'एकता'चा संदेश देणारे हे सादरीकरण उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहिले.

# 'आर्य चाणक्य' शाळेच्या विद्यार्थ्यांनी साकारली संविधानाची भव्य प्रतिकृती

**पैठण, दि. २६ नोव्हेंबर :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरात संविधान दिनाचे औचित डोळ्यासमोर ठेवत दोन एकर परिसरात मानवी विद्यार्थी साखळी द्वारे भव्य अशी संविधान प्रतिकृती साकारली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अहोरात्र कष्ट घेऊन संविधान लिहिले व आजच्या २६ नोव्हेंबर म्हणजे दिवशी भारत सरकार व भारतीय नागरिकांनी संविधान स्विकारले. तो दिवस माणसाच्या मनावर रुजला व कोरला जावा या दृष्टीने आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर या शाळेने अनोखा उपक्रम घेतला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, डॉ. पद्मकुमार कासलीवाल, नंदकिशोर मालानी प्रमुख वक्ते डॉ.अमोल म्हस्के, प्रमुख उपस्थिती रमेश शेळके, दादा गलांडे, राहुल पगारे, शिवाजी राठोड, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या हस्ते भारत माता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून समस्त भारतीयांनी संविधानचे वाचन करण्याचे सांगण्यात आले. हे संविधान प्रतिकृती साकारण्यासाठी भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुदाम पोल्हारे, सर्फराज अंबेकर, मनोज शिंगारे, सचिन सूर्यनारायण, प्रियंका निकाळजे, राखी धोकटे, अर्चना गिरवलकर, शुभांगी सदावर्ते, उज्वला कुटे, सोनाली कवडे, कविता राऊत, बाळू लाड, धीरज हंडारगुळे, शिवराज धनसुरे, महेश भुसारे, प्रमोद काकडे, विनोद सरोदे, रुपाली बोर्डे, अनुराधा डोंगरे, शिखा शाह, मीनाक्षी पिंपळे, समृद्धी डिघुळे, ग्रीष्मा चौके, अविनाश गर्डे, प्रफुल्लचंद्र कावसनकर आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास खर्डेकर यांनी केले तर आभार भास्कर कुलकर्णी यांनी केले.

## नम्मा टोयोटा हब्बा २०२५ उत्सवाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ नोव्हेंबर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी नम्मा टोयोटा हब्बा २०२५ या बहुप्रतीक्षित उत्सवाचे आयोजन केले, जो कर्नाटकाच्या समृद्ध संस्कृती, भाषा आणि परंपरांचा रंगतदार उत्सव होता. यावर्षीच्या कॅल्चरल फ्युजन या थीमअंतर्गत, कर्नाटकातील हळूहळू लुप्त होत चाललेल्या पण अत्यंत मौल्यवान लोककला आणि नृत्यप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले – जसे की डोल्लु कुनिता, वीरगासे, कंसाळे, देवरा कुनिता आणि कीलुगोंबे. या कार्यक्रमाने विविध वारशांमधील सुसंवादाचे दर्शन घडवले, ज्यातून स्थानिक परंपरांबद्दल टीकेएम चा सखोल आदर आणि आम्ही कार्यरत असलेल्या समुदायांच्या विकासासाठीची वचनबद्धता प्रतिबिंबित झाली. या महोत्सवात टीकेएम गॉट टॅलेंट या विशेष प्लॅटफॉर्मचे आयोजन करण्यात आले,ज्याद्वारे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या कला आणि कौशल्याचे प्रदर्शन करता आले. संगीत, नृत्य, कथाकथन, आणि चित्रकला अशा विविध कलांच्या माध्यमातून टोयोटाच्या सहकार्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन या संध्याकाळी घडले. कर्नाटकाच्या शास्त्रीय आणि लोककला परंपरांवर आधारित कर्मचाऱ्यांच्या नेत्रदीपक सादरीकरणांसोबतच, कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रमुख कलाकार शरण यांची विशेष उपस्थिती आणि प्रसिद्ध प्लेबॅक गायक राजेश कृष्णन आणि त्यांच्या टीमद्वारे मेलोडी नाईट या संगीत सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## आदित्य प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन

**पुणे :** राष्ट्रकार्यासाठी गेली १०० वर्षे अखंडपणे कार्य करणार्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल सर्व समाजाच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येत्या सोमवारी (१ डिसेंबर) सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी आज येथे दिली. येत्या सोमवारी सायं. ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड येथे होणार्या. या सोहळ्याला कांचीपीठाचे जगद्गुरु शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती स्वामी यांचे आशीर्वचन लाभणार आहे.

यावेळी बोलतांना अभ्यंकर म्हणाले की, १९२५ पासून आजपर्यंत असंख्य संघ प्रचारक, कार्यकर्ते, स्वयंसेवक यांनी या राष्ट्रासाठी आपले सर्वस्व समर्पित केले आहे. राष्ट्रकार्यात अनेक स्वयंसेवकांनी बलिदान देखील दिले आहे. अशा सर्वांबद्दलच कृतज्ञता व्यक्त करणे हे संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे. संघशताब्दीच्या निमित्ताने हा योग जुळून आला आहे, याचा आनंद वाटतो. समाजातील चांगल्या आणि सकारात्मक बाबींचा, उपक्रमांचा आणि ध्येयनिष्ठ व्यक्तींचा गौरव करण्याचे काम आदित्य प्रतिष्ठान १९८३ पासून करीत आहे. लोकशिक्षण आणि भारतीय संस्कृती संवर्धन ही प्रतिष्ठानचे प्रमुख उद्दीष्टे आहेत. प्रतिष्ठानच्या वतीने अनेकविध धार्मिक आणि वैचारिक विषयांवरील ग्रंथांची निर्मिती देखील सातत्याने केली जात असते. २००९ पासून प्रतिष्ठानच्या वतीने लक्ष्मी वासुदेव पुरस्कार प्रदान केले जातात. भारतरत्न लता मंगेशकर, भीमसेन जोशी, महाराष्ट्र भूषण बाबासाहेब पुरंदरे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार, डॉ. प्रकाश व मंदा आमटे अशा अनेक प्रभृतींना या पुरस्काराने गौरविले आहे. लोणावळ्याजवळ मावळ तालुक्यात सुमारे ३३ एकर जागेत भव्य वैश्रिवरक संत भारती उभी राहत आहे, ज्यामध्ये संतांचे अधिष्ठान असलेले विद्यापीठ व सांस्कृतिक, आध्यात्मिक नगरी असेल. समाजाने यामध्ये दानाच्या द्वारे सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानने करीत आहे.

# 'ऑन दि स्पॉट' पेंटिंग स्पर्धेतून प्रकटले चिंतनगाहचे निसर्गदर्शन



**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ नोव्हेंबर :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवांतर्गत 'ऑन दि स्पॉट पेंटिंग' स्पर्धेचे आयोजन आज सकाळी चिंतनगाह परिसरात उत्साहात पार पडले. लॅण्डस्केप ऑफ एनीथिंग विथिन द चिंतनगाह ही आकर्षक थीम असल्याने सहभागी विद्यार्थी कलाकारांना परिसरातील सौंदर्य, शांतता आणि निसर्गरूप आपल्या कॅनव्हासवर उतरवण्याची संधी मिळाली.

या स्पर्धेत विविध विद्यापीठांतील एकूण २० विद्यार्थी कलाकारांनी सहभाग घेतला. दिलेल्या २ तास ३० मिनिटांच्या वेळेत प्रत्येक कलाकाराने चिंतनगाहचा निसर्ग आपल्या अनोख्या शैलीत व्यक्त केला. काही विद्यार्थ्यांनी चिंतनगाहातील महात्मा गांधी यांची प्रतिमा आपल्या चित्रातून उभी केली, तर काहींनी भारताचे राष्ट्रचिन्ह सत्यमेव जयते या वचनासह भव्य सौंदर्य रंगांत मांडले. अनेकांनी परिसरातील हिरवाई, शांत वातावरण आणि खुल्या जागेचे सौंदर्य सुंदर रंगसंगतीत साकारले. स्पर्धेदरम्यान सर्व सहभागी कलाकार एकाग्रता, सर्जनशीलता आणि उत्साहाने चित्रनिर्मितीत मग्न होते. वेळ संपता–संपता त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या कलाकृतीबद्दलचा अभिमान आणि समाधान झळकत होते. या स्पर्धेतून युवा कलाकारांना आत्मविश्र्वास, नवनिर्मिती आणि अभिव्यक्तीचा सुंदर मंच मिळाला असून स्पर्धेने चिंतनगाहच्या सौंदर्याला रंगांच्या माध्यमातून नव्या अर्थाने साकार केले.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात संविधान दिन

**सोयगाव, दि. २६ नोव्हेंबर :** येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने



२६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,पदव्युत्तर समन्वयक डॉ.शत्रुघ्न भोरे तर प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लेखाचंद मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयांमध्ये संविधान दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.लेखाचं मेश्राम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,विद्यार्थी,शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांना संविधान दिनाचा पूर्ण इतिहास सांगून सखोल मार्गदर्शन केले.त्यानंतर संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.पंकज गावीत,डॉ.सुनील चौधरे महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले तर डॉ. सुनील चौधरे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे,डॉ.पंकज गावित,डॉ.सुनील चौधरे,डॉ. श्रीकृष्ण परिहार व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सोयगाव परिसरात थंडी झाली गायब!

**सोयगाव, दि. २६ नोव्हेंबर :** किमान तापमान ९.६ अंशांवरून रविवारी दि.(२३ नोव्हेंबर) थेट १२.८ अंशांवर पोहोचले. त्यामुळे थंडीचा जोर लक्षणीयरीत्या कमी झाला असून तालुकावासीयांना सोमवारी सामान्य दिवसाचा अनुभव आला. काही दिवसांत गारठ्याने थरथरायला लावणारी थंडी अचानक ओसरल्याने जनजीवन पूर्वपदावर आले असून 'थंडी गेली उडून' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

सार्वजनिक बांधकाम विभाग

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजना - सन २०२४-२५ अंतर्गत

ई- निविदा सूचना क्र. :- ४४५/सन.२०२५-२६

ई-निविदा आय.डी.क्र. १२५१९१७-१.

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजना** सन २०२४-२५ अंतर्गत १ कामाची ई-निविदा सुचना क्र. ४४५ सन २०२५-२६ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त, यांचे मान्यतेने)

सही/-
शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

## अग्रलेख...

# माओवाद्यांच्या विनंतीमागे व्यूहरचना?

आतापर्यंत माओवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक मुद्दा असल्याची सर्वांची धारणा होती. मात्र, केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे व धडक कारवायांमुळे माओवाद प्रभावित क्षेत्र आता काही जिल्ह्यांपुरते मर्यादित झाले आहे. ते सतत संकुचित होत चालले आहे. अलिकडे केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य भूपतीने शरणागती पत्करली आणि क्रूरकर्मा माडवी हिडमाचा खात्मा करण्यात आला. माओवाद्यांना एकामागून एक धक्के बसत असताना आता महाराष्ट्र-मध्यप्रदेश आणि छत्तीसगड (एमएमसी) क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता अनंतने निवेदन जारी करीत तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना साकडे घातले आहे. आम्हाला शरणागती पत्करायची असल्याचे सांगत, यासाठी त्याने १५ फेब्रुवारीपर्यंतच्या मुदतीची मागणी केली आहे. केंद्र सरकार आणि भाजपाशासित राज्यांनी घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे माओवाद्यांची पुरती कोंडी झाली असल्याचा हा पुरावा होय. सरकारने मनावर घेतल्यास मोठ्यात मोठ्या दहशतवादी चळवळी नेस्तनाबूत होतात, याची उदाहरणे आहेत. सुरक्षा दलांनी धडक कारवायांत नक्षल्यांना ठोकले. त्यामुळे एमएमसीने शरणागतीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत मिळण्याची विनवणी केली असावी, असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु, माओवाद्यांचा आतापर्यंतचा इतिहास पाहता ही त्यांची नवीन व्यूहरचना असावी, असा संशय व्यक्त करायलाही जागा आहे. त्यामुळे या मुद्यावर सरकारने अत्यंत सावधपणे पावले उचलणे अपेक्षित आहे.

पशुपती ते तिरुपती रेड कॉरिडॉर उभारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या माओवाद्यांना केंद्र सरकारने प्रचंड धक्का दिला आहे. शरण या, नाही तर कारवाईसाठी सज्ज राहा, असा इशारा देऊनच केंद्र सरकार थांबले नाही, तर तो इशारा प्रत्यक्षात आचरणातही आणला गेला. अत्यंत दुर्गम भागात तयार केलेले माओवाद्यांचे गड उद्ध्वस्त केले गेले. नक्षल्यांचे कित्येक नेते ठार झाले तर अनेकांनी शरणागती पत्करली. माओवादी चळवळ विध्वंसक वादळासारखी समोर सरकत चालली होती. केंद्राने केलेल्या उपाययोजनांमुळे तिला अचानक पायबंद बसला. आता माओवादी सैरभैर झालेले आहेत. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशातील आदिवासीबहुल अरण्याच्या प्रदेशात नक्षल्यांनी संघटनात्मक यंत्रणा तयार केली होती. या भागांतील दारिद्र्य, आदिवासी समाजातील मागासलेपणा, प्रशासनापर्यंत पोहोचणाऱ्या सेवांचा अभाव, नैसर्गिक संसाधनांवर होणारा संघर्ष इत्यादी कारणांचा गैरफायदा घेत माओवादी संघटना वाढू लागल्या होत्या. त्या काळात जनताना सरकार, क्रांतिकारी न्यायालये आणि शेकडो सशस्त्र दले उभारली गेली. ही संपूर्ण साखळी पशुपतिनाथ (नेपाळ) ते तिरुपती (आंध्रप्रदेश) अशा विशाल भौगोलिक पट्ट्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी निर्माण केली जात होती. यूपीएच्या काळात केंद्र सरकारने माओवाद्यांच्या विरोधात फक्त भीमगर्जना केल्या. प्रत्यक्षात फारसे झाले नाही. केंद्रात भाजपाचे सरकार आल्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने नक्षल्यांची कोंडी झाली. माओवादाच्या विरोधातील ९० टक्के लढाई केंद्र सरकारने जिंकल्याचे दिसत आहे. त्यामुळेच एमएमसीने शरणागती पत्करण्याची तयारी दर्शविली असावी. मात्र, त्यासाठी मागण्यात आलेली १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत संशयास्पद आहे. केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य भूपतीने शरण येण्यापूर्वी जारी केलेल्या पत्रात माओवाद्यांना सजग केले होते. शरणागती पत्करल्यानंतर समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहनही त्याने माओवाद्यांना केले होते. अशा परिस्थितीत एमएमसीने शरणागतीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत मागणे अनाकलनीय ठरते. केंद्र सरकारने शरणागतीसाठी ३१ मार्च २०२६ ही 'डेडलाईन' यापूर्वीच माओवाद्यांसाठी जाहीर केलेली आहे. माओवाद्यांचा यापूर्वीचा इतिहास पाहता शरणागतीचा बहाणा करून सुरक्षा दलांना, स्थानिक प्रशासनाला आणि कधी-कधी गावकऱ्यांना फसवण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. शत्रूला भ्रमात टाकणे, खोटी माहिती पसरवणे आणि आपल्याला फायदा होईल, अशी परिस्थिती निर्माण करण्याची त्यांची पद्धत आहे. शरणागतीचा बनाव करून फसवणूक करणे हे त्यातील सर्वांत धोकादायक तंत्र. माओवादी गटांनी आत्मसमर्पणासाठी वाटाघाटी सुरू झाल्याचे संदेश देऊन सरकारी दलांना विशिष्ट ठिकाणी बोलाविले आणि सुरक्षा दले शांततेच्या अपेक्षेने पुढे जात असताना घातपात घडविण्यात आले, हाही इतिहास आहे. एमएमसीचे सदस्य अशा प्रकारची मुदत मागून भ्रमित करू शकतात. या अवधीचा वापर करीत छुपे गटही तयार करू शकतात किंवा परिस्थिती निवळेपर्यंत एखाद्या सुरक्षित आश्रयस्थळी जाण्याचा प्रयत्नही करू शकतात, हे नाकारता येत नाही. माओवाद्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवणे अशक्यच. भूपतीने शरणागती पत्करण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात 'अस्थायी' स्वरूपात शस्त्रे खाली ठेवण्याचा उल्लेख केला होता. अस्थायी हा शब्द खटकणारा आहे आणि त्यामुळेच अशी मुदत मागणे ही धूळफेक तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. जंगलातील लढाईत माघार घ्यावी लागत असल्याने शहरी भागांतील लढाईवर लक्ष केंद्रित करण्यासाठी भूपतीसह इतर माओवाद्यांनी शरणागती पत्करली असावी, असा संशय 'अस्थायी' शब्दामुळे घेतला जाऊ शकतो. एमएमसीच्या पत्रासोबतच माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचे एक पत्रही समोर आले आहे. त्यात पीएलजीचा २५ वा स्थापना दिवस २ ते ८ डिसेंबर या कालावधीत देशभरात क्रांतिकारी उत्साहात साजरा करणार असल्याचे म्हटले आहे. याउलट हा सप्ताह साजरा करणार नसल्याचे एमएमसीने पत्रात म्हटले आहे. अशा परिस्थितीत संशय अधिकच गडद होतो. हिडमाच्या खात्म्यानंतर काही गोष्टींमध्ये अचानक बदल झाला आहे. समाज माध्यमांवर हिडमाला एखाद्या नायकासारखे चित्रित केले जात आहे. हिडमा हा आदिवासी, जंगल-जमीन आणि पाण्याचा रक्षक असल्याचे चित्र रंगविले जात आहे. वर्ष-दीड वर्षापूर्वी हिडमाने शाळकरी मुलाची गळा चिरून क्रूर हत्या केली होती. ज्या हिडमाने ७६ जवानांचा बळी घेतला, जिरम खोऱ्यात महेंद्र कर्मा आणि काँग्रेसच्या नेत्यांची हत्या केली, त्यांच्या मृतदेहांवर थयथयाट करण्याचा निर्दयी प्रकार करण्यात आला, तो हिडमा आदिवासी रक्षक कसा, या प्रश्नाचे उत्तर त्याला नायक ठरवू पाहणाऱ्यांनी दिले पाहिजे. दिल्लीत काही विद्यार्थ्यांनी त्याच्या समर्थनार्थ केलेल्या नारेबाजीमागे शहरी माओवादीच आहेत. जंगलातील लढाईत माओवाद्यांचा पराभव होत आहे. शहरांतील लढाई अत्यंत कठीण स्वरूपाची असते. तेथे नक्षल्यांना ओळखायचे कसे हा प्रश्न असतो. शिवाय, शहरी माओवाद अस्तित्वात नाही, असा युक्तिवाद केला जातो. सीपीआय (माओवादी) पक्षाच्या सैद्धांतिक दस्तऐवजांमध्ये मात्र शहरी कारवायांच्या घटकाला विशेष महत्त्व दिलेले आहे. माओवादी चळवळीची मुख्य लढाई ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात असली, तरी शहरांचा वापर हा धोरणात्मक तळ म्हणून केला जातो, असे त्या दस्तवेजांमध्ये स्पष्ट नमूद आहे. माओवादी विचारानुसार शहरी भाग हे क्रांतीसाठी दोन मुख्य कारणांनी महत्त्वाचे आहेत. पहिले म्हणजे शहरांतून आर्थिक, तांत्रिक, बौद्धिक आणि प्रचारात्मक आधार मिळू शकतो. दुसरे म्हणजे, शहरी समाजातील असंतोष, कामगार संघटना, विद्यार्थी चळवळी किंवा सामाजिक न्यायाच्या मुद्यांचा वापर करून शासनाविरुद्ध व्यापक वातावरण तयार करता येते. म्हणूनच त्यांच्या घटनेत शहरातील फ्रंटल संघटना, भूमिगत नेटवर्क, विद्यार्थ्यांच्या-कामगारांच्या संघटना आणि प्रचारयुद्ध लढणाऱ्या युनिटचा तपशीलवार उल्लेख आहे. शहरी कारवायांचा मुख्य उद्देश राजकीय अस्थिरता, माहिती संकलन, निधी उभारणी आणि कायद्याच्या राज्याविषयी अविश्वास निर्माण करण्याचा असतो. माओवादी संघटनांच्या धोरणानुसार शहरांतील समर्थकांनी थेट हिंसा न करता माहितीचे युद्ध, न्यायिक संघर्ष, प्रचार साहित्याचा प्रसार आणि राजकीय संरक्षण कवच तयार करणे अपेक्षित आहे. हे शहरी नेटवर्क जंगलातील सशस्त्र युद्धाला अप्रत्यक्ष आधार पुरवते. सध्या माओवादी घाबरलेले, गोंधळलेले असले, तरी ते मुळात हिंसक आणि कावेबाज आहेतच. त्यामुळे त्यांच्या कोणत्याच विनवणीवर किंवा आश्वासनावर विश्वास न ठेवता केंद्र व राज्य सरकारांनी त्यांना ठोकत राहावे, हेच योग्य? ▮

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# विकासाचे महामार्ग

भारतात गेल्या १० वर्षांमध्ये केंद्र शासनाच्या समग्र आणि एकात्मिक दृष्टिकोनामुळे पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास झाला आहे. धोरणांमध्ये सुधारणा व युद्धपातळीवर राबविले जाणारे प्रकल्प यांच्या भक्कम पायाभरणीवर आधारित परिवर्तनामुळे दळणवळण सुविधांचा विस्तार तर झालाच; आर्थिक उत्पादकता वाढली. मालवाहतूक आणि साठवणुकीचा खर्च कमी झाला आणि पुरवठा सेवाही सुधारली. प्रगती, पीएम गतिशक्ती, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण, भारतमाला, सागरमाला आणि उडान अशा प्रमुख राष्ट्रीय प्रकल्पांनी एकत्रितरीत्या संपर्कसुलभतेमुळे भारत जागतिक स्पर्धेला तयार झाला आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टाला अनुसरूनच हे रूपांतरण घडते आहे. 'प्रगती' उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३६३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. याद्वारे पंतप्रधान केंद्र सरकारचे सचिव, राज्यांचे मुख्य सचिव यांच्यासोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधतात. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन सरकारी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीद्वारे हमी व निरनिराळ्या आंतर मंत्रालयीन किंवा संघराज्यीय समस्यांमुळे आधी रखडलेले महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामकाजाची गती वाढविणे याद्वारे उद्दिष्ट साध्य करण्यात येते.

भारताच्या आर्थिक क्षेत्रांमधील बहुआयामी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी 'पीएम गतिशक्ती' राष्ट्रीय बृहद आराखडा उपक्रम १३ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू करण्यात आला. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे १०० कोटी रुपयांचा निधी कार्यक्षमरीत्या वापरला जात आहे. रेल्वे, रस्ते, बंदरे, जलमार्ग, विमानतळ, अवजड वाहतूक आणि लॉजिस्टिक्ससंबंधी पायाभूत सुविधा या सात महत्त्वाच्या क्षेत्रांवर आधारित हा उपक्रम मंत्रालये व राज्य सरकारांच्या माध्यमातून विकासाला चालना देत आहे. 'पीएम गतिशक्ती' उपक्रमाच्या तत्त्वांनुसार विविध मंत्रालयांच्या १५.३९ लाख कोटी रुपये खर्चाच्या २०८ मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यांकन केले गेले आहे. विविध मंत्रालये आणि राज्य सरकारांच्या भारतमाला, सागरमाला, जलमार्ग, बंदरे, उडान यासारख्या पायाभूत सुविधा योजना यामुळे एकत्रित होतील.

वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक, मत्स्य व्यवसाय, कृषी इत्यादी आर्थिक क्षेत्रांमधली दळणवळणाची सुविधा सुधारल्यामुळे भारतीय उद्योग जागतिक स्पर्धेचा सामना करण्यास सज्ज असतील. यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. विदेशी गुंतवणूक वाढेल आणि जगातले भारताचे स्थान उंचावेल. राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण एकात्मिक, कार्यक्षम आणि वाजवी खर्चाच्या लॉजिस्टिक सुविधांचे जाळे निर्माण करून भारताच्या आर्थिक विकासाला



चालना देण्यासाठी १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी करणे, २०३० पर्यंत लॉजिस्टिक्स कार्यक्षमता निर्देशांका (एलपीआय) मध्ये जगातील पहिल्या २५ देशांमध्ये स्थान मिळविणे आणि माहिती आधारित निर्णयांना प्रोत्साहन देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. यामुळे भारतीय उत्पादनांची भारतासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढेल तसेच कमी झालेल्या खर्चामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमधील कार्यक्षमता वाढीस लागेल; परिणामी मूल्यवृद्धी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल. या पृष्ठभूमीवर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा (एनएचएआय) ने चालू आर्थिक वर्षात ५२ महामार्ग प्रकल्पांसाठी निविदा मागवल्या आहेत. त्यांची एकूण लांबी २१८८ किलोमीटर असून सर्व प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी १.१५ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च आवश्यक आहे. त्यामुळे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय २०२५-२६ मध्ये १० हजार किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे उद्दिष्ट जलदगतीने पूर्ण करण्यास मदत करू शकते. या ५२ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. १५ प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले असून लवकरच मंजुरी देण्यात येईल. सहा प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे पाठविण्यात आले आहेत. १० प्रकल्प स्थायी वित्त समितीकडे (एसएफसी) मूल्यांकनासाठी पाठविण्यात आले आहेत आणि तीन प्रकल्पांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यासाठी तयार आहे. 'एनएचएआय'ने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४५०० किलोमीटर रस्ते देण्याचे आणि पाच हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत ५०४.३२ किलोमीटर लांबीचे ४३ प्रकल्प मंजूर केले आहेत आणि २,०६०.९९ किलोमीटरचे काम पूर्ण केले आहे. पहिल्या सहामाहीमध्ये सुरुवात मंद असली, तरी मंत्रालय निश्चितच वर्षासाठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करेल. सप्टेंबरच्या अखेरीस, गेल्या वर्षी याच कालावधीत ३८०० किलोमीटरच्या तुलनेत ३ हजार २०० किलोमीटर रस्ते पूर्ण करण्यात आले होते. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या महामार्ग मुद्रीकरणाच्या प्रकरणात 'आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर टोल ऑपरेट ट्रान्सफर' (टीओटी) मोडद्वारे मुद्रीकरण केलेल्या ऑपरेशनल मालमत्तेसाठी सर्वाधिक बोली लावणारी कंपनी म्हणून उदयास आली आहे. कंपनीने उत्तर प्रदेशमधील ३३३.४ किलोमीटर महामार्ग नेटवर्कसाठी ९,२०० कोटी रुपयांच्या ऑफरसह बोली जिंकली. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने चालू आर्थिक वर्षासाठीचे त्यांचे मुद्रीकरणाचे लक्ष्य वाढवून ४० हजार कोटी रुपये केले आहे. २०२४-२५ मध्ये महामार्ग निर्मात्याने मुद्रीकरणाद्वारे २८,७२४ कोटी रुपये उभारले होते. या वर्षाच्या एकूण उद्दिष्टापैकी १५ हजार कोटी रुपये 'टीओटी' आणि 'इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' (आयआयटी) मार्गांद्वारे येतील; उर्वरित प्रकल्प आधारित वित्तपुरवठ्यातून येतील.

'टीओटी' अंतर्गत सर्वात जास्त बोली लावणाऱ्या आणि तांत्रिक निकष पूर्ण करणाऱ्याला ज्या महामार्गांसाठी सवलत मिळाली आहे, त्यावर टोल वसूल करण्याचा अधिकार मिळतो. सवलतीचा कालावधी २० वर्षांचा असतो. त्यानंतर मालमत्ता 'एनएचएआय'कडे परत येते. मालमत्तेच्या मुद्रीकरणाच्या पावत्या भांडवली खर्चासाठी 'एनएचएआय'कडे परत पाठविल्या जातात. सध्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या एकूण अर्थसंकल्पीय संसाधनांपैकी १० टक्के मुद्रीकरण पूर्ण करत आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे पायाभूत सुविधा गुंतवणूक ट्रस्ट मार्गाच्या पाचव्या फेरीसाठी मुद्रीकरणाची बोली प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

पुढील काही आठवड्यांमध्ये सुरू होणाऱ्या पाचव्या फेरीत 'एनएचएआय'ने एकूण ५५० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे नऊ रस्ते मुद्रीकरणासाठी निवडले आहेत. हे रस्ते महाराष्ट्र, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील आहेत. या वर्षी महामार्ग मुद्रीकरणाद्वारे निधी उभारणीसाठी ४० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाशिवाय राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांचे बांधकाम विभाग आदी माध्यमांमधून रस्तेबांधणीला चालना दिली जात आहे. त्यात पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून गावागावांपर्यंत चांगले रस्ते तयार होत आहेत. पाणंद रस्त्यांच्या माध्यमातून थेट बांधावर पोचण्याची व्यवस्था होत आहे. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# 'दोस्ता'चा अलविदा!

चित्रपट म्हणजे कथा नव्हे, असे अधोरेखित करीत आपल्या अभिनय शैलीच्या जोरावर प्रत्येक व्यक्तिरेखेला जिवंत करणारा अभिनेता धर्मेंद्र यांनी स्वतःला सिद्ध केले. कुणीही सिद्धहस्त नसतो; मात्र संघर्षातून व्यक्ती घडत जाते. अशाच संघर्षाच्या अनेक खाचखळग्यातून वाटा काढीत आपले वेगळेपण दाखवून देतानाच, गत ६५ वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजविणाऱ्या अभिनेत्याच्या जाण्याने एक संघर्षगाथा संपली, असे म्हणता येईल.



काळ आला होता, पण वेळ आली नव्हती याची प्रचीती १५ दिवसांपूर्वी आली. हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळेपण अधोरेखित करणारे 'ही मॅन' अशी ओळख असलेले अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाचे वृत्त वाहिन्यांवर आले. मात्र नंतर त्यांच्या कुटुंबीयांनी वास्तविकता पुढे मांडून धर्मेंद्र उपचाराला प्रतिसाद देत असल्याचे सांगितले होते. त्यांच्यावर नंतर घरीच उपचार सुरू होते. दरम्यान, १५ दिवसांपूर्वी न आलेली वेळ २४ नोव्हेंबर रोजी आली अन् असंख्य चाहत्यांना वेड लावलेला अभिनेता जगाचा निरोप घेत निघून गेला. खरं तर धर्मेंद्र यांची चित्रपटसृष्टीतील कारकीर्द आणि त्यांनी केलेला खडतर प्रवास हा त्यांच्या जिद्द आणि चिकाटीची परीक्षा घेणारा होता. त्यातही न डगमगता चित्रपटसृष्टीला वेगळी ओळख देण्याचे धाडस आपल्यातच आहे, हे त्यांनी दाखवून दिले. शिक्षकाचा मुलगा, मात्र अभ्यासाची फारशी आवड नाही. आपण पडद्यावर दिसावे या भोळ्या आशेने चित्रपटसृष्टीत पाऊल टाकतो; स्वतःच्या अभिनय शैलीच्या जोरावर जे काही यश संपादन करतो, ते सुवर्ण अक्षरात लिहावे असेच! काहींकडे देखणेपणा, काहींकडे अभिनय अशा वैशिष्ट्यांसह हृदय जिंकणाऱ्या कलावंतांपैकी धर्मेंद्रही त्या काळी एक होते. साधेपणा, प्रामाणिकता आणि मेहनती स्वभाव घेऊन १९६० साली 'दिल भी तेरा, हम भी तेरे' या पहिल्या चित्रपटाच्या माध्यमातून धर्मेंद्र यांनी आपल्या अभिनयाला सुरुवात केली. काळ पुढे जात असताना अभिनायाच्या अनेक संधी मिळाल्या आणि त्यांच्यातील अभिनयाच्या छटा उलगडत गेल्या. बंधन, सत्यनाम, आई मिलन की बेला हे चित्रपट कायम चाहत्यांच्या स्मरणात घर करून राहावे असेच आहेत; ज्यात धर्मेंद्र यांच्या बहुआयामी अभिनयाची ओळख चित्रपटसृष्टीला झाली. चॉकलेट हिरो, रोमँटिक आणि ॲक्शन हिरो म्हणून स्वतःला अभिनयाच्या वेगवेगळ्या पठड्यांवर त्यांनी सिद्ध केले. 'फूल बने पत्थर' चित्रपटाने 'ही मॅन' म्हणून ओळख निर्माण करण्यात धर्मेंद्र यशस्वी झाले होते.

पडद्यावर रडता येत नव्हते. दुःख आणि राग या भावनांना चेहऱ्यावर व्यक्त करताना गोंधळ उडणारा हा अभिनेता मात्र जाता जाता चाहत्यांना रडवून गेला. नाचणे माहीत नसलेला हा अभिनेता नंतर मात्र ही कसोटीही तेवढ्याच दिमाखात यशस्वी झाला होता. 'स्त्रीचे सौंदर्य पाहावे आणि पुरुषांचा पराक्रम पाहावा' अशा मानसिकतेच्या असलेल्या हिंदी सिनेमासृष्टीत स्त्रीच्या दृष्टीने पुरुषाचे सौंदर्यही 'पाहण्याचा विषय' असू शकतो, असा धडा धर्मेंद्रने 'फूल और पत्थर' चित्रपटाच्या माध्यमातून घालून दिला. बलदंड कमावलेले शरीर व त्याच्या विसंगत आपुलकीने काठोकाठ भरलेला चेहरा प्रेम आणि प्रसंगी आपले रक्षणही करू शकतो हे आश्वस्त करणारा धर्मेंद्र यांचा अभिनय चित्रपटसृष्टीला नवी दिशा आणि नवा आयाम देणारा ठरला. शोले चित्रपटातील 'वीरू' कुणी विसरू शकेल? अनेक अजरामर चित्रपटांपैकी शोलेने गाजविलेला काळ विलक्षण असाच होता. म्हणूनच तर आजही आपल्या हक्कासाठी आंदोलने होतात, ती शोले स्टाईलने! हिंदी चित्रपटसृष्टीला नवे आयाम, अभिनयाच्या नवनवीन कक्षा वृद्धिंगत करण्याचे काम या अभिनेत्याने केले. ६५ वर्षे सिनेसृष्टीची सेवा केली; मात्र कुठेही वेगळा आविर्भाव नाही! अभिनेता म्हणून काम करताना, राजकारणात 'नेता' म्हणून काम करण्याचा प्रयत्न झाला, पण राजकारण त्यांना भावले नाही. फिल्मफेअर अवॉर्ड, २०१२ साली मिळालेला पद्मभूषण पुरस्कार हे धर्मेंद्र यांच्या अभिनयासह माणुसकीचे कौतूक करणारेच म्हणावे लागेल. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या संघर्षगाथा आता संपली असली, तरी त्यांच्या अष्टपैलू अभिनयाची, साधेपणा आणि स्वभावातील सौम्यतेची जी छटा असंख्य चाहत्यांच्या मनावर कोरली गेली आहे, ती पुसट होणे नाही. विविध धाटणीच्या व्यक्तिरेखा साकारताना ३०० हून अधिक चित्रपटांची देणगी देणारा हा अभिनेता 'ये दोस्ती हम नही छोडेंगे' म्हणत असला, तरी असंख्य दोस्तांना सोडून तो निघून गेला, हेच वास्तव आहे. ▮

९७६३७१३४१

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# श्रीगीता - मोक्षसंन्यासयोग (भाग दुसरा)

श्रीमद्भगवद्गीतेचा १८ वा अध्याय मोक्षसंन्यासयोग नावाने परिचित आहे. या अध्यायाच्या प्रथम लेखात आपण पहिल्या ४० श्लोकांवर विचार केला होता. त्यात आपण कर्मत्याग आणि कर्मसंन्यास यावर चिंतन पाहिले. त्यापुढील विचार पाहू... त्रिलोकातील सर्व जीव प्रकृतीच्या त्रिगुणातच बांधिल आहेत. आत्मज्ञान महत्त्वाचे असून त्यामुळेच मोक्षप्राप्तीचा मार्ग प्रशस्त होतो. गुणकर्मानुसार कर्म आणि त्यावरूनच समाजपुरुषाची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही वर्णरचना आहे.

'शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ शम, दम, शौच, क्षमा, सरळता, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक बुद्धी आहे तो ब्राह्मण.

'शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ शौर्य, तेज, धृती, चतुरता, शत्रूला पाठ न दाखविण्याची हिंमत, दान आणि स्वामित्व वृत्ती असते तो क्षत्रिय.

'कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥'

ज्याच्याजवळ कृषी, गोपालन आणि व्यापार असतो तो वैश्य. ज्याच्याजवळ सेवाभाव असेल तो शूद्र.

'श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥'

आपल्या स्वकर्मात तत्पर पुरुषाला आत्मसिद्धी प्राप्त होते. ही आत्मसिद्धी कशी प्राप्त होते तर विश्वव्यापक भगवंताचे स्वकर्माने पूजन केल्यावर होते. इथे स्वकर्म म्हणजे स्वधर्म होईल. आपले स्वकर्म निष्ठेने केल्यामुळे नैष्कर्म अवस्था प्राप्त होते. म्हणजे कर्म करूनही कर्म न केल्याची अनुभूती.

'जे धावतया कर्माची लाणी, नैष्कर्म बोधाची खाणी ।
जे भूकेलिया धनी, साधनाची ।'

ही अवस्था यावी. त्यासाठी काय करावे तर-

'विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानस ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥'

नैष्कर्म अवस्थेसाठी नित्य स्वकर्मासोबत थोडा एकांतवास, अल्प आहार आणि ध्यान योग करावा.



'अहङकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥'

अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, संग्रह यांचा त्याग करून हे माझे, ते तुझे असा ममत्व भाव त्यागून अंतःकरणात शांती असणारा पुरुष आत्मसिद्धी होण्यास पात्र ठरतो. असा पुरुष कायम ब्रह्मानंदात असतो. अखेर त्याला शाश्वत, अविनाशी असे वैष्णव पद प्राप्त होते. भगवंत पुढे सांगतात-

'मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्वमहाङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥'

म्हणून हे अर्जुना, माझ्यात चित्त स्थिर कर. माझ्या कृपेने भवसागर पार करशील. कर्माला नैष्कर्म कर आणि युद्ध कर.

'यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥'

मी युद्ध करणार नाही हा तुझा अहंभाव समज. तसेही युद्ध तुझ्या हातात नसून तुझी धारण झालेली प्रकृतीच आता तुला युद्धासाठी प्रवृत्त करेल.

'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया ॥'

ईश्वर सर्वांच्या हृदयात विराजमान आहे. तोच मायेच्या साहाय्याने तुझे विहित कर्म करून घेईल. 'मी कर्ता म्हणशी, तेणे तू दुःखी कष्टी होशी'. म्हणून श्री कर्ता म्हण.

'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥'

हे अर्जुना, तू अनन्यभावाने शरण जा. कर्ता-करविता भगवंतच असल्याचे ध्यानात ठेवून यथायोग्य कर्म तू कर, हे सांगून भगवंत समारोपीय बोलतात.

'इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥'

तू मला अत्यंत प्रिय असल्यामुळे मी तुला हे गुह्यतिगुह्य ज्ञान तुला सांगितले. हे अर्जुना! तू माझ्यात मन ठेवणारा, माझे पूजन करणारा भक्त हो. त्यामुळे तू माझ्याच स्वरूपाला प्राप्त होशील, हे सत्य मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो आहे.

'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥'

सर्व धर्म म्हणजे तुझ्या गुणकर्मानुसार करत असलेल्या कृतींचा परित्याग करून केवळ मलाच शरण जा. मी तुला मोक्ष प्राप्ती करून देईन. हे गीताज्ञान मी तुला दिले आहे, पण हे तत्त्वज्ञान तू अभक्ताला, माझी निंदा करतो त्याला मुळीच देऊ नको. जो माझ्यावर नितांत श्रद्धा ठेवून हे गीतातत्त्व इतर भक्तांना सांगतो, तो माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो. अशा पुरुषाहून अधिक प्रिय मला कोणीही नाही. जो या गीतेचे अध्ययन करतो तो माझी पूजाअर्चाच करतो. जो पुरुष श्रद्धायुक्त अंतःकरणाने केवळ श्रवण करेल तो पापमुक्त होऊन पुण्यात्मा बनेल. हे अर्जुना! मला सांग, तुझा मोह नष्ट झाला का? त्यावर अर्जुन हृदयातून त्वरित उत्तरतो-

'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥'

तेव्हा अर्जुन म्हणतो की, हे अच्युता! माझा मोह पूर्णतः नष्ट झाला असून तुझ्या वचनाचे मी तंतोतंत पालन करेल. इथे कृष्णार्जुन संवादाची सांगता होते. आपल्याला हे माहीत आहे की, हा सर्व संवाद संजय धृतराष्ट्राला ऐकवत होता. हर्षित होऊन संजय धृतराष्ट्राला स्पष्टच बोलला-

'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥'

की हे राजा! जिथे योगेश्वर कृष्ण आहेत आणि धनुर्धारी अर्जुन आहेत तेथे श्री, विजय, वैभव व निश्चल नीती आहे. संजय धृतराष्ट्राला हेच समजावून सांगताहेत की, हे राजन, विजय पांडवांचाच होणार आहे. कारण ईश्वर त्यांच्यासोबत आहे. शक्य असेल तर अजूनही युद्ध थांबव. पण धृतराष्ट्र प्रवृत्ती राक्षसी प्रवृत्ती आहे. श्रीमद्भगवद्गीतेची सुरुवात धृतराष्ट्राने केली. सांगता संजयाने केली. मध्ये कृष्ण-अर्जुन संवाद आहे. ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

'गुंतलो होतो अर्जुन गुणे । मुक्त जाहलो तुझिया गुणे ।
आता सांगणे पुसणे । काहीच न लगे !'

आपल्या सर्वांमध्ये धृतराष्ट्र नावाचा एक गुण किंवा प्रवृत्ती आहे. संजय नावाचा एक गुण किंवा प्रवृत्ती आहे. अर्जुन नावाचा एक गुण असतो आणि आपल्यातच श्रीकृष्ण नावाचाही गुण असतो. श्रीगीता म्हणजे धृतराष्ट्र प्रवृत्तीकडून संजय प्रवृत्तीकडे, संजय प्रवृत्तीकडून अर्जुन प्रवृत्तीकडे आणि अर्जुन प्रवृत्तीकडून श्रीकृष्ण प्रवृत्तीकडे जाणे. व्यष्टी ते परमेष्ठी अशी विकासात्मक उकल म्हणजे श्रीमद्भगवद्गीता होय. ▮

९८२२२६२७३५

## सोन्या-चांदीची घसरण सामान्यांना दिलासादायक

मागील काही महिन्यांपासून सोन्या-चांदीच्या दराने उच्चांकी झेप घेतली आहे. मात्र, दिवाळीनंतर सोन्या-चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. दीपावली सणानिमित्त सोने-चांदी खरेदी करण्याकडे सामान्य ग्राहकांचा ओढा असतो. त्यामुळे दरातही वाढ होत असते. वाढत्या मागणीमुळे सोन्या-चांदीच्या दरात ऐतिहासिक वाढ झाल्याचे दिसून आले. मध्यमवर्गीय जनतेसाठी ही दरवाढ अतिशय अनपेक्षितच होती. परंतु, आता सणासुदीचा हंगाम संपल्यानंतर सोने आणि चांदी यांची झळाळी कमी होताना दिसत आहे. यापुढील काळात किमती आणखी घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. युरोपपासून ब्रिटनपर्यंत व न्यू यॉर्कपासून मुंबईपर्यंत सोन्या-चांदीच्या दरात घसरण सुरू आहे. तेजीचे निशाण फडकावणाऱ्या सोन्या-चांदीची घसरणीकडे होत असलेली वाटचाल चर्चेचा विषय ठरत आहे. त्यामागच्या कारणांचा शोध घेता जागतिक पातळीवरील टॅरिफ तणाव कमी होत असल्यामुळे सोन्या-चांदीचे दरही सामान्यांच्या आटोक्यात येत असावेत. सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने खरेदी करण्याकडे भारतीय ग्राहकांचा कल राहिला आहे. अतिसामान्य कुटुंबातील व्यक्तीदेखील मुला-मुलींच्या लग्नानिमित्त तोळा-दोन तोळे सोने खरेदी करीत असतात. परंतु मागील काही महिन्यात सराफा बाजाराकडे न फिरकणारा ग्राहक दर घसरणीमुळे पुन्हा परतू शकतो. सणासुदीनंतर मागणी कमी झाल्यामुळे ही दर घसरण सुरू असली पाहिजे.

भारतीय महिलांना सोन्याच्या दागिन्यांचा प्रचंड सोस असल्याचा नेहमीच आक्षेप घेतला जातो. भारतीय कुटुंबात परंपरेनुसार स्त्रीधन म्हणूनदेखील सोन्याच्या दागिन्यांना महत्त्व आहे. या पृष्ठभूमीवर भारतीय ग्राहक कायमच सोने-चांदी बाजाराकडे आकर्षित होत आला आहे. त्याचबरोबर भारतीयांनी ही आवड लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात आपल्या देशात सोन्याची तस्करीही होत आली आहे. गुंतवणुकीसाठी सोने खरेदी करणाऱ्या प्रवृत्तीपेक्षा सामान्य ग्राहकांना विवाह कार्यानिमित्त दागिन्यांची करावी लागणारी खरेदी हीच बाजारातील तेजीचे कारण करत आले आहे. सध्या सुरू असलेली सोन्या-चांदीच्या दरातील घसरण अशीच राहावी, ही सामान्य ग्राहकांची अपेक्षा असली तरी आगामी लग्नसराईचा हंगाम पाहता सोने आणि चांदीच्या दरांमध्ये वाढदेखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रा. मधुकर चुटे** /९४२०५६६४०४८

## वाचक पत्रे

## वारकरी संप्रदायाला वादात ओढू नका

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. येथे अनेक संत झाले. त्यांचे वेगवेगळे संप्रदाय आहेत. प्रत्येक संप्रदयाचे कार्य, नियम त्या संताच्या आचरणानुसार आहे. वारकरी संप्रदाय खूप जुना व मोठा आहे. त्या संप्रदायामध्ये बुवाबाजी, अंधश्रद्धा व भक्तवर्गात भेदभाव नाही. सर्व संतांचे वचन बोले तैसा चाले असेच आहे. परंतु बुवाबाजी, फसवणूक झालेल्या लोकांनी वारकरी संप्रदायाला दोष दिला. एका कीर्तनकाराच्या मुलीचा साखरपुड्याच्या कार्यक्रमाला सुद्धा वारकरी संप्रदायाशी जोडण्यात येत आहे, हा सर्व प्रकार चुकीचा आहे. सध्या किती जण संतांच्या वचन, प्रथेनुसार वागतात हाच प्रश्न आहे. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असलेले मानव सर्व क्षेत्रामध्ये भेटतील. तेव्हा वारकरी संप्रदायाला कुठल्याही वादात ओढू नये, हीच अपेक्षा. ▮

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-९४

बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

### यश तुझे झळकु दे दिगंतरी
### तू विसरु नको राष्ट्रास तरी

यश तुझे झळकु दे दिगंतरी तू विसरु नको राष्ट्रास तरी ॥धृ.॥

जीवनकलिका पूर्ण फुलू दे पावित्र्याचे तेज चढू दे
देशप्रीतिचा गंध भरू दे जीवन होइ व्यर्थ ना तरी ॥१॥

विसर जिवाला नच ध्येयाला विसर घराला नच देशाला
विसरु नको रे परंपरेला उज्ज्वल मनि इतिहास धरी ॥२॥

भूल पडावी भ्याडपणाची भूल पडावी अहंपणाची
भूल नको पण कर्तव्याची स्वार्थाची ती भूल बरी ॥३॥

धगधगती तत्त्वावर निष्ठा मान जिवाची हीच प्रतिष्ठा
अनुसरतील जन कळुनी येता तत्त्वपुजारी खरोखरी ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# 'संविधान अमृत महोत्सव' राज्यभर लोकचळवळ म्हणून साजरा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ नोव्हेंबर -**

भारतीय संविधान हे जगातील सर्वाधिक लोकशाहीप्रधान व समतेवर आधारित संविधान मानले जाते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाची हमी देणाऱ्या या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना संविधान अमृत महोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता लोकचळवळीचे स्वरूप मिळावे, या मागणीसाठी कळंब येथील दयावान प्रतिष्ठानतर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात राज्यभर खालील उपक्रम अधिकृतरीत्या राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांत सामूहिक संविधान प्रस्तावना वाचन, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर संविधान जनजागृती रॅली, ग्रामीण व शहरी भागात संविधान मूल्यांवर आधारित कार्यशाळा व प्रशिक्षण शिबिरे, युवकांमध्ये संविधानप्रेम निर्माण करण्यासाठी विशेष शैक्षणिक व सामाजिक अभियान.




निवेदनात नमूद केले आहे की, संविधान हा केवळ ग्रंथ नसून भारतीय लोकशाहीची आत्मा आहे. त्यातील मूल्ये समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत. अमृत महोत्सव हा सरकारी पातळीवर न राहता जनतेचा उत्सव झाला पाहिजे.

दयावान प्रतिष्ठानने राज्यभर हा महोत्सव मोठ्या प्रमाणावर, अधिकृत पातळीवर साजरा करण्यासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, तसेच घेतलेला निर्णय लवकरात लवकर कळवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

कार्यक्रमावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इम्रान मुल्ला, उपाध्यक्ष इम्रान काझी, तसेच समीर सय्यद, अक्षय सातव, विशाल फल्ले, शफिक शेख, मुन्ना तांबोळी, बबलू शेख, आकाश पवार, मोसिन मुल्ला, अलीम दारूवाले, आकाश किरवे उपस्थित होते.

> स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर साजऱ्या होणाऱ्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर हा 'संविधान अमृत महोत्सव' सामाजिक जागृतीचे अभियान आहे. युवा पिढीत संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी आणि हा महोत्सव औपचारिक न राहता लोकशाही मूल्यांची जनचळवळ व्हावी, यासाठी आमचा हा प्रयत्न.
> **- अभय गायकवाड,** दयावान प्रतिष्ठान, कळंब

# आरोग्य विभागाच्या विविध समित्यांच्या महत्त्वपूर्ण बैठका संपन्न

## ▶▶ टीबी मुक्त भारत, लसीकरण व गुणवत्तावृद्धीवर भर...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

आरोग्य विभागाच्या विविध समित्यांच्या महत्त्वपूर्ण बैठका २० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आल्या. या सभेत जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने या बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी डॉ.मैनाक घोष,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., डॉ. सतीश हरिदास, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ.मारुती गोरे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग), डॉ. अभिजीत बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ.के.के. मिटकरी, जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी, डॉ. सुशील चव्हाण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रमजान शेख, वैद्यकीय अधिकारी आर.बी. जोशी, प्रशासकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय सास्तुर तसेच सर्व वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय प्रमुख, सर्व तालुका आरोग्य अधिकारी आणि समिती सदस्य उपस्थित होते.



बैठकीत मुख्यत्वे खालील समित्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यामध्ये रुग्ण कल्याण समिती (जिल्हा रुग्णालय धाराशिव), जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटी, आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८), पी.सी.पी.एन. डी.टी. सल्लागार समिती, तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती, आर.के.एस. समिती, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, जिल्हास्तरीय लसीकरण टास्क फोर्स,१५ वा वित्त आयोग, जन्म-मृत्यू नोंदणी समन्वय समिती, अनधिकृत वैद्यकीय व्यावसाय (बोगस डॉक्टर) शोध समिती व राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रगती, मातृ-मृत्यू व बाल-मृत्यू दर कमी करण्यासाठीचे उपक्रम, कुपोषण निर्मूलन मोहिमेची स्थिती, प्राथमिक व ग्रामीण आरोग्य केंद्रांतील सुविधा, रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेची सद्यस्थिती, तसेच डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग, कुष्ठरोग आदी आजारांविरोधातील उपाययोजना या सर्वांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींवर मार्गदर्शनही करण्यात आले.

या सभेमध्ये जिल्ह्यातील आरोग्य संस्था-निहाय टीबीमुक्त भारत अभियानाचा देखील आढावा घेण्यात आला. यात २ लाख ८३ हजार १७४ जोखीमग्रस्त लोकसंख्येची निक्षय पोर्टलवर नोंदणी करायची असून १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत एक लाख १५ हजार ४४४ एवढी नोंदणी पूर्ण झाली आहे. तसेच ४४ हजार ६१३ एक्स-रे झालेल्या व्यक्तींची नोंदणी निक्षय पोर्टलवर करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागांमध्ये संशयित क्षयरुग्ण शोधण्याचे काम उद्दिष्टानुसार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या हस्ते दोन क्षयरुग्णांना पोषण आहार किट देण्यात आले. क्षयरुग्णांच्या पोषणासाठी दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले.

बैठकीच्या शेवटी, जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेच्या उन्नतीसाठी पुढील कालावधीसाठी सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# जळकोटवाडी नळ येथील सरपंचांसह अनेकांचा भाजपात प्रवेश



## आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोटवाडी नळ येथील सरपंच मंगलताई कमलाकर जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

आमदार पाटील यांच्या नेतृत्वाखाली तुळजापूर तालुका सातत्याने विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याने गावातील लोकप्रतिनिधी व नागरिकांचा कल वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर सरपंच मंगलताई चव्हाण, माजी सरपंच चंद्रकला वाघदरे, तसेच श्रीधर कदम, बारकुलबाई सोमवंशी, सुकुमार कदम, रघुनाथ जाधव, मनोज लष्करे, मनोज कदम, सुरेश पवार, सचिन कदम, अरुण कदम, प्रकाश राठोड, बालाजी घोरपडे, गंगाराम भांगे, परमेश्वर कदम, राजेंद्र वाघमारे, गोकुळ कदम, अप्पाराव कदम, बंकट राठोड, सचिन लष्करे, बब्रुवान पवार, हरीदास कदम, गुणवंत मुळे, बालाजी लष्करे व मच्छिंद्र सुरवसे यांनी भाजपात प्रवेश केला. या नवागत कार्यकर्त्यांचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सत्कार करून पक्षात स्वागत केले.

या प्रवेशामागे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष सोनटक्के आणि तांडा सुधार समितीचे अशासकीय सदस्य विलास राठोड यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तुळजापूर तालुक्यात भाजपची ताकद वाढवणारा हा सामूहिक प्रवेश उत्साहात पार पडला.

# महाविस्तार ॲप : शेतकऱ्यांच्या हातात डिजिटल कृषिज्ञानाचे प्रभावी साधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक स्मार्ट, वैज्ञानिक आणि उत्पादनक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असलेल्या महाविस्तार (MahaVISTR) ॲपने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळवला आहे.

१६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ५०३० शेतकऱ्यांनी हे ॲप डाउनलोड केले असून, शेतकरी डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारत असल्याचे हे सूचक उदाहरण असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले. शासनाने डिसेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक गावातील किमान २० टक्के शेतकऱ्यांनी हे ॲप सक्रियपणे वापरण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

# अवैध दारूविरोधात शिराढोण पोलिसांची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

अवैध दारू निर्मिती व विक्रीच्या विरोधात शिराढोण पोलिसांनी मोठी कारवाई करत चार ठिकाणी धाड टाकून मोठ्या प्रमाणात गुळमिश्रीत रासायनिक द्रव, गावठी दारू व देशी-विदेशी मद्य जप्त केले. या कारवाईत चार आरोपींविरोधात महाराष्ट्र मद्यनिषेध कायद्यान्वये स्वतंत्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

दि.२२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता घारगाव तांडा, ता. कळंब येथे पहिली कारवाई करण्यात आली. आरोपी मीरा रामराव पवार (वय ४६) जप्त: अंदाजे ६५,००० रुपये किंमतीचा १,००० लिटर गुळमिश्रीत रासायनिक द्रव व २५० लिटर गावठी दारू उद्देश: अवैध विक्री, आरोपी चांगुनाबाई जनक राठोड (वय ४४) जप्त: अंदाजे ४९,५०० रुपये किंमतीचा ७५० लिटर रासायनिक द्रव व २०० लिटर तयार गावठी दारू, आरोपी विनोद बालु पवार जप्त: अंदाजे ७४,५०० रुपये किंमतीचा १,२५० लिटर रासायनिक द्रव व २०० लिटर गावठी दारू.

तिन्ही ठिकाणी आरोपींच्या राहत्या घरांसमोरच मोठ्या प्रमाणात अवैध दारू निर्मितीचे साहित्य व दारूचा साठा मिळून आला.

# रोटरीतर्फे कळंबमध्ये उद्या मतदार जागृती रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ नोव्हेंबर -**

लोकशाहीच्या बळकटीसाठी प्रत्येक नागरिकाने मतदानात सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी आणि तहसील कार्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता भव्य मतदार जागृती रॅली आयोजित करण्यात येत आहे. रॅलीची सुरुवात तहसील कार्यालय परिसरातून होणार असून, स्थानिक शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, स्वयंसेवक आणि रोटरी सदस्य या रॅलीत सहभागी होणार आहेत.

या उपक्रमाचे आयोजन मा. तहसीलदार हेमंत ढोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे अध्यक्ष रो. डॉ. अभिजीत जाधवर आणि सचिव रो. श्याम जाधवर यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. याशिवाय प्रकल्प प्रमुख रो. रवि नरहिरे आणि रो. अरविंद शिंदे यांनी शाळांशी समन्वय, रॅलीतील उपक्रमांची आखणी तसेच जनजागृती संदेशांची रचना यासाठी विशेष मेहनत घेतली आहे.



रॅलीदरम्यान विद्यार्थी घोषवाक्ये, फलक आणि जनजागृती संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देणार आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे मत मौल्यवान असल्याचा संदेश या रॅलीद्वारे पोहोचवण्यात येणार आहे.

नागरिक, पालक आणि सर्व सामाजिक घटकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मतदानाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# वाशी येथे दत्त मंदिर देवस्थानतर्फे दत्त जन्मोत्सवानिमित्त भव्य धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ नोव्हेंबर -**

दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट वाशी यांच्या वतीने दत्त जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून मुख्य दत्त जन्माचा कार्यक्रम गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता पार पडणार आहे.

या पवित्र उत्सवाची सुरुवात गुरुवार, २७ नोव्हेंबर पासून होऊन कार्यक्रमांची सांगता शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे. संपूर्ण आठवडाभर नामस्मरण, कीर्तन व विविध आध्यात्मिक उपक्रमांनी परिसर भक्तिमय वातावरणाने नटणार आहे.

दररोज रात्री ९ वाजता प्रसिध्द किर्तनरत्न ह.भ.प. सुनील महाराज आष्टीकर (सेलू, जि. परभणी) यांचे श्रुसाव्य किर्तन होणार आहे. तबलावादक : चैतन्य देशपांडे, हार्मोनियम वादक : तेजस रत्नपारखी (हिंगोली) यांचे कार्यक्रम होणार आहेत. त्यानिमित्त भाविकांना ज्ञान, भक्ती आणि अध्यात्मिक समाधान मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते ७ विविध संस्कृत व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, भाविकांसाठी गुरुचरित्र पारायण आयोजित करण्यात आले आहे.

गुरुवार, ४ डिसेंबर हा मुख्य उत्सव दिवस असून कार्यक्रमांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे सकाळी ६ वाजता श्री. रुद्राभिषेक, सकाळी ११ वाजता पालखी नगर प्रदक्षिणा, सायंकाळी ६ वाजता दत्त जन्म कार्यक्रम, दाते आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

या पवित्र कार्यक्रमासाठी बंडू मोळवणे, महेश कुंभार, रवींद्र लिखिते, विवेक श्रीकृष्ण जोशी, नंदकिशोर बारगजे, भाऊसाहेब माळी, प्रकाश पत्की, हनुमंत अवधूत चेडे, देशमुख आदी मान्यवर दाते पंगत सेवेसाठी पुढाकार घेणार आहेत.

शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ रोजी दत्तात्रय पांडुरंग महाजन यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सर्व कार्यक्रम श्री दत्त मंदिर देवस्थान, ब्राह्मण गल्ली, वाशी येथे होणार आहेत.

वाशी तसेच तालुक्यातील सर्व भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त जन्मोत्सव कमिटी, वाशी यांनी केले आहे.

# कळंब प्रकल्पात अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी ऑनलाइन भरती प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामीण), कळंब अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या रिक्त पदांसाठी सरळसेवेने (इू छेळपरींळेप) भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. संबंधित गावातील स्थानिक पात्र महिला उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया २४ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाली असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ डिसेंबर २०२५, सायं. ६.१५ वाजेपर्यंत आहे. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून एक प्रत बाल विकास प्रकल्प अधिकारी, कळंब कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे आवश्यक आहे. कळंब प्रकल्पातील विविध गावांमधील एकूण १६ रिक्त पदांसाठी ही भरती होत आहे. यामध्ये - सेविका पदे : बारातेवाडी (२), देवळाली, मंगरूळ, मलकापूर, रत्नापूर. मदतनीस पदे : आथर्डी, बोरगाव, इटकुर, करंजकल्ला, खामसवाडी, निपाणी, बांगरवाडी, पानगाव, परतापूर, उमरा शैक्षणिक पात्रता : किमान इयत्ता बारावी उत्तीर्ण अट : उमेदवार स्थानिक रहिवासी महिला असणे अनिवार्य आहे. वयोमर्यादा : १८ ते ३५ वर्षे (विधवा उमेदवारांसाठी ४० वर्षे) इतर अट : जास्तीत जास्त दोन हयात अपत्य, जात, रहिवास व शैक्षणिक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक आहे. अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी करून नियुक्ती आदेश देण्यात येतील. रुजू न झाल्यास किंवा पद रिक्त झाल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी दिली जाईल. प्रतीक्षा यादी एक वर्ष वैध राहणार आहे.

भरती प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक असून कोणत्याही मध्यस्थाच्या भ्रमात न पडण्याचे प्रशासनाने आवाहन केले आहे. तसेच भरतीदरम्यान दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# अणदूरमध्ये श्री खंडोबा यात्रेनिमित्त रंगतदार कुस्ती स्पर्धा : रोहन पवार आणि राहुल मुळे ठरले मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२५ नोव्हेंबर -**

अणदूर येथील ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रेनिमित्त देवस्थान समिती व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कुस्ती स्पर्धा शनिवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांना गावच्या पारंपरिक हलग्यांनी विशेष रंग भरला तर उपस्थित प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात पैलवानांनी सादर केलेल्या अप्रतिम डावपेचांनी संपूर्ण वातावरण कुस्तीमय झाले.

स्पर्धेच्या सुरुवातीला अनुदुर्व परिसरातील कुस्ती क्रीडेला आयुष्यभर योगदान देणारे स्व. मारुती खोबरे गुरुजी यांना स्मृतिपूर्वक अभिवादन करण्यात आले. या रंगतदार स्पर्धेत मोहोळचा पैलवान रोहन पवार याने पुण्याच्या शुभम माने यास चितपट करून देवराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाबूराव चव्हाण यांनी जाहीर केलेल्या लाख रुपये पारितोषिकावर नाव कोरले.

तर अणदूरचा पैलवान राहुल मुळे याने प्रभावी डावपेचातून प्रतिस्पर्ध्याला चितपट करत गावचा मान उंचावला. त्याला स्व. नीलकंठप्पा आलुरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शामराव आलुरे यांनी जाहीर केलेल्या ५० हजार रुपयांच्या पारितोषिकाचा मान मिळाला. राहुलच्या विजयानंतर अणदूर ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला.

जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणातील आखाड्यात झालेल्या या स्पर्धांचे उदघाटन श्री नीलकंठेश्वर मठाचे मठाधिपती श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते झाले. सरपंच रामचंद्र आलुरे, माजी सरपंच धनराज मुळे, तंटामुक्ती समिती उपाध्यक्ष कल्याणी मुळे, यात्रा कमिटीचे अविनाश मोकाशे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यभरातील मल्लांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. स्पर्धेचे समालोचन गोविंद घारगे यांनी केले.

स्पर्धेत पंच म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सिद्धाराम धमुरे, सुंदर जवळगे, मार्तंड मोकाशे, शिवाजी क्हाडे, मनोज मुळे, शाम गायकवाड, गुरुनाथ मिटकरे, आप्पा साखरे, प्रकाश मुळे यांनी जबाबदारी पार पाडली.

कुस्ती स्पर्धा यशस्वी पार पडण्यासाठी गावातील देणगीदार, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी मोठे योगदान दिले. पैलवानांच्या कुस्त्या देणगीदारांच्या हस्ते लावण्यात आल्या.



स्पर्धेला श्री खंडोबा यात्रा कमिटीचे पदाधिकारी, विविध समित्यांचे पदाधिकारी व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. संपूर्ण दिवस रंगतदार कुस्त्यांनी गाजलेला अणदूरचा आखाडा हे यात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज लोह्यात सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

लोहा व कंधार नगरपरिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्या गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी लोहा येथे जाहीर सभा होणार असून, माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री व नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे आदी नेते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.



गुरुवारी २७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता बैल बाजार, लोहा येथे ही मुख्यमंत्री फडणवीस यांची जाहीर सभा होईल. लोहा नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी तसेच कंधार नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गंगाप्रसाद यन्नावार यांच्यासह दोन्ही शहरातील नगरसेवक पदाचे भाजपचे उमेदवार या सभेला उपस्थित राहणार आहेत. या सभेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे नांदेड दक्षिण ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष डॉ.संतूक हंबरडे,लोहा विधानसभेचे भाजपा प्रभारी एकनाथ पवार यांनी केले आहे. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नांदेड जिल्ह्यातील ही पहिलीच जाहीर सभा असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्वप्नपंख नाटकाने दुर्लक्षित घटकांच्या शैक्षणिक प्रश्नाला केले अधोरेखित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजन करण्यात आलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५-२६ च्या प्राथमिक फेरीत नांदेड केंद्रावर मंगळवार ता. २५ रोजी स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड च्या वतीने दिनेश कवडे लिखित आणि दिग्दर्शित 'स्वप्नपंख ' हे नाटक सादर करण्यात आले. शंकरराव चव्हाण नाट्यगृह नांदेड येथे झालेल्या या प्रयोगाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

मनुष्य जन्मताना पंख घेऊन येत नाही. पण त्याच्या स्वप्नांना मात्र पंख असतात आणि त्या पंखांना बळ देण्याचं काम हे शिक्षण करत असतं हे स्वप्नपंख या नाटकाने आधोरेखित केले. स्वप्नपंख हे नाटक एका चहा



विक्रेता आणि त्याच्या मुलीची गोष्ट नाही तर त्या लाखो कुटुंबांची कहाणी आहे, जे रोज जगण्यासाठी लढतात, धावत राहतात, पडतात, पुन्हा उभे राहतात.

या नाटकातील ज्ञानेश्वर ने हे संघर्ष करणाऱ्या बापाची भूमिका उत्तम रित्या सादर केली. मुलीचं भविष्य वाचवण्याची धडपड तर दुसऱ्या बाजूला प्रशासकीय व्यवस्था कागद, नियम, राजकारण, धर्माचे खेळ यात गरीब माणूस कसा चिरडला जातो हे या नाटकाच्या माध्यमातून दिग्दर्शक दिनेश कवडे यांनी प्रभाविपणे मांडले. या नाटकातील एका प्रमुख भूमिकेत असलेली आराध्या हीचा अभिनय प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवून गेला. कथेला अनुरूप नैपथ्य, प्रभावी प्रकाश योजना आणि दृशांना अनुसरून संगीत हे या नाटकाचे वैशिष्ट्य होते.

या नाटकातील ज्ञानेश्वर ची भूमिका (शाम डुकरे), विद्या (आराध्या पांचाळ), मंगला (सौ. किरण टाकळे), सलीम (गौतम गायकवाड), रहीम (अथर्व देसाई), मास्तर (संदेश महाबळे), कर्मचारी (डॉ. अजय पाटील), आक्का (शांती वैद्य), पंकज (अमोल कुंटेवाड), दुष्यंत (नागेश डोईबळे), कार्यकर्ता (परीक्षित पांचाळ), अमोल (समर्थ खेडकर), छोटा मुलगा (दिशांत कवडे), नृत्यांगना (सेजल क्रिपलानी, जान्हवी कदम, राखी देशमुख) यांनी पार पाडली. तर नाटकाला प्रभिविपणे सादर करण्यात प्रकाश योजना (प्रतिभा शेंडे, कैलाश पोपुलवाड), संगीत संयोजन व नृत्य दिग्दर्शन (सुधांशू सामलेट्टी), नैपथ्य (दिनेश कवडे व गौतम गायकवाड), रंगभूषा (किरण टाकळे, सुधांशू सामलेट्टी), वेशभूषा (शांती वैद्य, संदेश महाबळे) व गीत रचना (दिनेश कवडे) यांचे मुख्य योगदान होते.

आज सायंकाळी ७ वा. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा निर्मित, अतुल साळवे द्वारा लिखित व दिग्दर्शित 'तो ती आणि मनोहर' हे नाटक सादर होणार आहे. नाममात्र रु. १५ व रु. १० मध्ये तिकीट दर असलेली ही राज्य नाट्य स्पर्धा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी व सांस्कृतिक कार्य संचालनालायाचे संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.




## बिरसा मुंडा व शामा कोलाम यांच्या प्रतिमांचे अनावरण

**किनवट-** मांडवा येथे आज आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारी वीर धरतीआबा बिरसा मुंडा व आदिवासी समाजातील पुरोगामी नेता शामा कोलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या जिवनकार्याचा गौरव करणारा फलक अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. हा सोहळा युवा नेते ड. प्रतीक केराम यांच्या हस्ते संपन्न झाला. जयंतीच्या औचित्याने ग्रामस्थांनी एकत्र येत दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रतिष्ठित मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सागरताई शिंदे, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, विहिंपचे अनिरुद्ध केंद्रे, ग्रामपंचायतचे सरपंच गोविंद आत्राम, ग्रामसेवक आरमाळकर, कृष्णकमल नाडकुंटीवार, उपसरपंच रविकांत वडलवार, देवराव येंड्रलवार, कमलबाई कुमरे, रामू धुर्वे, सरस्वती आत्राम, अविनाश मुंडे, अजय शिंदे यांचा समावेश होता. जयंतीचे औचित्य साधून आयोजित हा फलक अनावरण सोहळा अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला

## श्रीनिकेतन शाळेत दिन उत्साहात

**नांदेड** -दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन प्राथमिक शाळेत भारतीय संविधान दिन विविध कार्यक्रम घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.सौ.एस.एन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे निर्माते महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी शाळा परिसरात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी घोषणासह काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थी गणेश वाघमारे, मंजू देशमुख, रसिका कुरूडे, श्रेया कांबळे, तनवी रणवीर, माही केदारे, प्रतीक गायकवाड, रोहन गजभारे, हर्षद कीर्तने, आदी विद्यार्थ्यांनी संविधान दिनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक अविनाश इंगोले, प्रल्हाद आयनेले,सुदर्शन कल्याणकर, बाळकृष्ण राठोड, गतीश मगरे, सौ. सुरेखा मरशिवने, बालवाडी शिक्षिका सौ. बुद्धांगना गोखले यांच्यासह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा कार्य अध्यक्ष पदी मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती

**नांदेड** -महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या कार्यकारणीला मान्यता



दिली असून प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी नवीन कार्यकारणी घोषीत केली आहे. नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या जिल्हा कार्य अध्यक्ष पदी पक्षातील माजी नगरसेवक मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती करण्यात आली. मुन्तजीबोद्दीन गेल्या १४ वर्षापासुन नांदेड काँग्रेस कमिटीचे प्रवक्ता म्हणून काम पाहात आहेत. या नियुक्तीबद्दल मुन्तजीबोद्दीन यांनी नांदेडचे लोकप्रिय खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष (उत्तर) राजेश पावडे, नांदेड महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहे.

## अडचणीतल्या महिलांसाठी हक्काचा शासकीय आधार

**नांदेड** -महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत नांदेड शहरात माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह) ही शासकीय संस्था अनाथ, निराधार, निराश्रीत व अडचणीतल्या महिलांसाठी कार्यरत आहे. येथे १८ ते ६० वर्षांपर्यंत निवाऱ्याची आवश्यकता असणाऱ्या निराधार, विधवा, कुमारी माता, परित्यक्ता, आत्याचारीत महिलांसाठी विनाशुल्क अन्न, वस्त्र, निवारा, समुपदेशन व पुर्नवसनाची व्यवस्था केली जाते. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. येथे आवश्यकतेनुसार कायदेशीर सल्ला व मदत दिली जाते, तसेच नियमित आरोग्य तपासणी केली जाते. १८ वर्षापुढील महिलांना मानसिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच पुनर्वसनाच्यादृष्टिने त्यांच्या विवाहाकरीता संस्थेत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. येथे शिक्षण व प्रशिक्षण घेत असलेल्या महिलांना आवश्यकतेनुसार प्रवेश दिला जातो. समस्याग्रस्त १८ वर्षापुढील महिलांनी संकटकाळी चुकीच्या मार्गानी न जाता समस्येचे निराकरण होईपर्यंत अल्प कालावधीसाठी या संस्थेत दाखल होण्याच्या फायदा घ्यावा. प्रवेशासाठी फोटोसह ओळखपत्र आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कामकाजाच्या दिवशी दुपारी १ ते ३ यावेळेत अधीक्षक माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह), हॉटेल भाईजी पॅलेसच्या पाठीमागे शिवाजीनगर उड्डाणपुल परिसर शिवाजीनगर नांदेड येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२३३०४४ संपर्क साधावा, असे आवाहन नांदेड येथील शासकीय महिला राज्यगृह अधीक्षक अ.सा.ठकरोड यांनी केले आहे.

# संविधान दिनी पालकांनी शाळेला ठोकले कुलुप

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २६ नोव्हेंबर-**




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरकरनगर ईस्लापूर येथे डेपुटेशनच्या नावावर रोज अध्यापणासाठी शिक्षक बदलून येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा भविष्य अंधारात जात असल्याकारणाने जो पर्यंत शाळेला कायमस्वरूपी शिक्षक देत नाही तो पर्यंत शाळा उघडणार नाही म्हणून संविधान दिनी सविधानाचे वाचन करूण सदरील शाळेला येथील पालकांनी कुलुप लावले.

किनवट तालुक्यातील इस्लापुर येथील जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळेत गेल्या महिन्यापासून शाळेवर डेपुटेशनच्या नावावर रोज दोन दिवसात शिक्षक बदलुन येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे यामुळे विद्यार्थाचे कोणतेच बेसिक पुर्ण होत नसल्याने येथील पालकांनी मुख्यकार्यकारी अधिकारी नांदेड, व गट शिक्षणाधिकारी किनवट यांच्याकडे कायमस्वरूपी शिक्षक द्या या मागणीचे निवेदन दिले होते. परंतु त्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे दिनांक २६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास संविधाना दिनाच्या दिवशी संविधानाचे वाचन करूण शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभाराला वैतागुन अखेर पालकांनी शाळेला कुलूप ठोकले आहे .

शाळा १ ते ४ असुन किनवट तालुक्यात सदरील शाळा प्रथम क्रमांकावर असून येथे पट संख्या ४५ आहे .येथील विद्यार्थी वेगवेळ्या परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करुण राज्य व देश पातळीवर गेलेले आहे आशा शाळेकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष असल्यामुळे जनतेत शिक्षण विभागाच्या विरोधात तिव्र नाराजी वक्त होत आहे.

# 'तोट्यात' कोलमोडलेल्या नायगाव बाजार समिती सचिवांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २६ नोव्हेंबर-**

नायगाव शहराची ओळख असलेली व तालुक्याची आर्थिक कणखर मानली जाणारी नायगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आज दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभी आहे. बाजार समितीच्या आवारात सर्वत्र बांधकाम साहित्याचे ढीग, कचऱ्याचे साम्राज्य, दुर्गंधीचा फैलाव आणि प्रशासनाचे साफ दुर्लक्ष या सगळ्यामुळे परिसर अक्षरशः कचराकुंडी बनला आहे.

बाजार समितीच्या परिसरात अनधिकृतपणे बांधकाम साहित्य टाकले जात असून, येणारा-जाणारा नागरिक त्रस्त झाला आहे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून चिखलाचे डबके तयार झाले आहेत. दुर्गंधी इतकी वाढली आहे की व्यापारी, शेतकरी व ग्राहक नाक दाबून परिसरातून मार्ग काढताना दिसत आहेत.

एवढी गंभीर परिस्थिती असूनही प्रशासक आणि सचिव यांचे याकडे संपूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ज्यांच्या जबाबदारीवर बाजार समिती



उभी आहे, त्यांनाच या परिस्थितीची फिकीर नाही. मग सुधारणा कोण करणार? असा सवाल व्यापारी मंडळातून केला जात आहे. नायगाव बाजार समितीचा विस्तार संपूर्ण तालुकाभर पसरलेला असताना. ही समिती सतत तोट्यात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

**'जादा मुदत' सेवा चर्चेचा विषय**

नायगाव बाजार समितीचे सचिव संजय कदम यांची मागील पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी झालेली 'जादा मुदत' सेवा आता चर्चेचा विषय ठरला आहे. बाजार समितीची स्थिती दिवसेंदिवस ढासळत असताना सचिवांना मात्र खुर्चीचा मोह सुटत नसल्याने या सर्व घडामोडींवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. काहींना हे 'ठराविक संरक्षण' असल्याचा संशय असून, पंधरा वर्षे एकाच पदावर टिकून राहणे हा प्रश्नचिन्ह निर्माण करणारा मुद्दा ठरत आहे. कमिटी बदलली, प्रशासक बदलले, पण सचिव बदलत नाहीत, हे नेमके कशाचे संकेत? असा सवाल व्यापारी संघटनांकडून केला जात आहे.

**पारदर्शक प्रशासनाची अंमलबजावणी आवश्यक**

बाजार समितीची सद्यस्थिती पाहता तातडीने स्वच्छता मोहीम, आर्थिक लेखापरीक्षण, अनधिकृत कचरा व साहित्य टाकण्यावर कठोर कारवाई आणि पारदर्शक प्रशासनाची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे समाज विघटनातून सांगितले जात आहे. नायगाव तालुक्याचे आर्थिक केंद्र असलेली बाजार समिती आज अक्षरशः अस्तित्वाच्या संकटात सापडली असून, लवकरात लवकर सुधारणा न झाल्यास येणाऱ्या काळात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सिडको येथे संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास संविधान दिनानिमित्त दिनांक २६ नोव्हेंबर रोजी महिला मंडळ व परिसरातील समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करून संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले.तर सांची बुद्ध विहार संभाजी चौक सिडकोच्या वतीने संविधान रॅली सिडकोच्या मुख्य रस्त्याने काढण्यात आली.

लोकशाहीच्या आत्मा समजले जाणाऱ्या संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०२६ हा दिवस भारतीय इतिहासाचा स्वर्ण दिवस म्हणायला काही हरकत नाही. तो राष्ट्राच्या विचारसंस्कृतीला, नागरिकत्वाची गुणवत्ता, समाजाची नैतिकता आणि लोकशाहीचे आधारस्तंभ यांचे पुनर्मूल्यांकनांची आठवन करून देतो. यानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे सिडको हडको परिसरातील महिला मंडळ व उपासक, उपासिका, बालक, बालिका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या अभिवादन करून संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले. यावेळी महिलांनी संविधानाविषयी आपले मनोगत ही व्यक्त केले तर राहुलनगर वाघाळा येथिल जेष्ठ उपासक मारोती कांबळे यांनी संविधानावर सविस्तर माहिती दिली. याचवेळी सिडको येथील सांची बुद्ध विहार समितीच्या वतीने संविधान रॅली सिडकोतील मुख्य रस्त्याने काढण्यात आली. यावेळी सिडको हडको परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे घेण्यात आलेल्या संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते प्रदीप हनवते यांनी केले होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका सुजाता आढाव, कविता उघडेराव, वैशाली वाडे, सुनंदा दुधाटे, निरंजना लांडगे, ममता लांडगे, थोरात बाई, सूर्यवंशीबाई, सरपाते काकू, हटकर ताई, यांच्यासह मारुती कांबळे, विलास गजभारे, डि.के. कांबळे, बालाजी गायकवाड, गौतम जमदाडे, गोडबोले मामा यांच्यासह पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची उपस्थिती होती.

## बाजीराव पाटील जाधव शिरूरकर यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २६ नोव्हेंबर-**

तालुक्यातील शिरूर येथील रहिवासी व वयोवृद्ध शेतकरी बाजीराव शिवराम पाटील जाधव वय ९५ वर्षे यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पार्थिवावर दुपारी शिरूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी रामदास पाटील , पत्रकार बी. व्ही.चव्हाण, गणेशराव पाटील जाधव तळेगावकर , प्राध्यापक उत्तम जाधव , सतीश पाटील मातुळकर, सूर्यवंशी आधीच अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांचे पश्चात एक मुलगा , चार मुली, सुना ,जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# रोटरी व इन्नरव्हील क्लबच्या वतीने 'तयारी अभ्यासाची' कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

रोटरी क्लब नंदीग्राम आणि इन्नरव्हील क्लबच्या वतीने दि.३० नोव्हेंबर रोजी डॉ.बी.जी. पाटील यांचा तयारी अभ्यासाची हा कार्यक्रम डॉ.शंकरराव चव्हाण नाट्यगृहात होणार असल्याची माहिती रोटरी क्लबच्या अध्यक्षा स्मिता गंदेवार, इन्नरव्हील क्लबच्या डॉ.मीनाक्षी पाटील व रोटरी क्लबच्या माजी अध्यक्षा पुष्पा गायकवाड यांनी दिली.

दि.३० नोव्हेंबर रोजी दुपारी बारा ते दोन व सायंकाळी सात ते नऊ वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, शिक्षण अधिकारी माधव सलगर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. विद्यार्थी व पालकांच्या शैक्षणिक भविष्यासाठी हा कार्यक्रम असून, यामध्ये अभ्यासामध्ये गोडी कशी निर्माण करावी, आत्मविश्वास एकाग्रता, स्मरणशक्ती कशी वाढवावी, यशस्वी होण्याचे मार्ग कोणते, गणित विषयात आवड कशी निर्माण करावी, पाठ केलेले विसरल्यास काय करावे, यासह अनेक मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून, पालकांसह विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.बी.जी. पाटील यांनी यावेळी केले.

# मुदखेड नगर परिषदेची सत्ता राष्ट्रवादीच्या हाती द्या : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २६ नोव्हेंबर-**

मुदखेड नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक दि.२ डिसेंबरला होणार असून या निवडणुकीत मतदारांनी राष्ट्रवादीच्या हाती सत्ता द्यावी पंचवीस वर्षात जे अशोकरावने केलं नाही ते आम्ही विकास करून दाखवू असे राष्ट्रवादीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी घेण्यात आलेल्या प्रचार सभेत बोलताना केले.



यावेळी बोलताना चिखलीकर म्हणाले की अशोकराव एक दाना पेरून शंभर दाणे काढतात पैसे द्यायचे मतदान घ्यायचं आणि लाखो रुपये कमवायचे हा अशोकराव चा धंदा असून ते कुठेतरी थांबवलं पाहिजे त्यामुळे जनतेने यावेळी बदल घडून आणावा आणि राष्ट्रवादीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार गिरजाबाई माधवराव पचलिंग यांना निवडून द्यावे तसेच त्यांच्यासोबतचे सर्व नगरसेवकांना घड्याळाच्या चिन्हावर मतदान करून निवडून द्यावं अशी विनंती यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी जाहीर सभेत बोलताना केली.या जाहीर सभेला चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले.

याप्रसंगी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, नागोराव पचलिंग,पूजाताई व्यवहारे, यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# नागरी शिस्त ही सामूहिक जबाबदारी : भार्गवी मुंढे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

नागरी शिस्त राखण्याची जबाबदारी ही व्यक्ती, संस्था आणि प्रशासन या तिघांचीही संयुक्त आहे. सामूहिक जबाबदारीनेच समाज प्रगतिपथावर चालू शकतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे यांनी केले.



नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने आज यशवंतराव चव्हाण सभागृहात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, लेखाधिकारी निळकंठ पाचंगे, उपशिक्षणाधिकारी अवधूत गुंजेवार आदींची उपस्थिती होती.

मुंढे यांनी विविध राज्यांचे उदाहरण देत नागरी शिस्त व संविधानिक मूल्यांवर विवेचन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गाने सामूहिक जबाबदारी स्विकारली तर विकासाचा मार्ग सर्वांसाठी प्रशस्त होतो, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत घर-घर संविधान उपक्रमांतर्गत प्रत्येक घरापर्यंत संविधान उद्देशिका पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सर्वांनी भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे कर्मचारी रणजीत गजभारे यांच्या वतीने लाडूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, शशिकांत गोले, गंगाधर माचनवाड, विजय वाघमारे, रणजीत गजभारे, सोपान खिल्लारे, राजेश जोंधळे, साईचरण मुगावे, शिवसांब चेडू, गजेंद्र श्रीरामवार, कुलदीप जोशी, बालाजी आवर्दे उज्वला गजभारे, शालिनी शेळके, प्रतिभा चोळाखेकर, वैशाली थोरात, मोहिनी जाधव, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, सुरज नाईक, राजेश तावडे, अशोक पंडित आदींसह जिल्हा परिषदेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आ. संतोष बांगर हिस्ट्रीशीटर असल्यामुळे पोलिसांची कारवाई

## आ. तान्हाजीराव मुटकुळेंचे आ. बांगरांच्या आरोपांना उत्तर





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

नगर पालिका निवडणुक निर्भयपणे आणि शांततेत व्हावी यासाठी संपूर्ण राज्यभर पोलिस हिंस्ट्रीशीटरच्या घरांची झाडाझडती घेत आहे. शिवसेना आ. संतोष बांगर आठ वर्षापूर्वी ३०२ च्या केसमध्ये तुरूंगात होते. सहा वर्षापूर्वी ते तडीपार होते. त्यांचे नाव हिस्ट्रीशीटरच्या यादीत असल्यामुळे संपूर्ण राज्यभर हिस्ट्रीशीटरच्या घरांची झाडाझडती घेत आहे. मी त्यांच्या घराची झडती घ्यायला लावणारा कोण? असा सवाल करीत आ. संतोष बांगर यांच्या आरोपांना आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी उत्तर दिले आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकांमध्ये आता शिवसेना आणि भाजपमध्ये वार-पलटवार होत असून अवैध धंदे विरूध्द विकास कामे असा प्रचार जोर धरू लागला आहे. शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांच्या घराची तीन दिवसांपूर्वी पोलिसांनी सकाळी सहा वाजता झाडाझडती घेतली होती. याची खंत आ. बांगर यांच्या मनात कुठेतरी वाटत होती. त्यामुळे शहरातील एका कॉर्नर सभेत आ. संतोष बांगर यांनी सभेत बोलतांना म्हटले की, हिंगोलीचे स्थानिक आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या सांगण्यावरून सुमारे १०० पोलिसांनी पहाटे सहा वाजता माझ्या घरी आले. त्यावेळी माझ्या घरातील स्त्रीया, लेकरं बाळं झोपलेली होती. अचानक सकाळी पोलिस झाडाझडती घेण्यासाठी आले. त्यांनी घरातील सर्व ठिकाणी तपासणी केली. माझ्या घरातील फ्रिजही त्यांनी तपासले. एका आमदाराच्या घराची कोणाच्या सांगण्यावरून पोलिस सर्च वारंट घेवून तपासणी करीत असतील तर तुमच्यासारख्या सामान्य माणासचेकाय तुमच्या लाडक्या भावाला अशाप्रकारे त्रास देण्याचे काम स्थानिक आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडून होत आहे. त्यामुळे येत्या संतोष बांगर यांनी भावनिक कार्ड खेळत उपस्थित महिलांना लाडक्या बहिणी असे संबोधत या झाडाझडतीचे खापर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेवर फोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी आ. नगर पालिका निवडणुकीत लाडक्या बहिणी याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. असे भावनिक कार्ड यावेळी आ. बांगर यांनी खेळले.

या आरोपाला भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी चोख प्रत्त्युत्तर दिले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, नगरपालिका निवडणुका शांततेत, निर्भयपणे व्हाव्यात यासाठी संपूर्ण राज्यात हिस्ट्रीशीटर लोकांच्या घरांची झाडाझडती घेण्यात येत आहे. राहीला आ. संतोष बांगर यांचा प्रश्न त्यांच्यावर ८ वर्षापूर्वी ३०२ गुन्हा दाखल होता तसेच तुरूंगातही होते. तसेच ६ वर्षापूर्वी ते तडीपार होते. पोलिसांच्या यादीत हिस्ट्रीशीटर असणाऱ्यांच्या घरांची तपासणी होणारच. आमदार असले म्हणून काय झाले? ही निवडणुक निपक्षपाती व निर्भयपणे व्हावी यासाठी निवडणुक आयोगाचे आदेशाप्रमाणे पोलिसांनी कारवाई केली. त्यात माझा काय संबंध आहे असा सवालही यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केला.

या कॉर्नर सभेमध्ये आ. संतोष बांगर यांनी उपस्थित महिलांना दि २७ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता मंगळवारा बाजार येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. त्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गांधी चौकात भाजपच्या प्रचारासाठी जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. भाजपच्या जाहीर सभेला एकप्रकारे आव्हान देण्याचे काम आ. संतोष बांगर करीत आहेत काय? असा सवालही उपस्थित होत आहे.

# हिंगोलीत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा

## आ. मुटकुळेंकडून सभेच्या तयारीचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतीम टप्प्यात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर यांच्या तसेच भाजपच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि २७ नोव्हेंबर गुरूवारी येथील गांधी चौकात दुपारी चार वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या तयारीचा आढावा बुधवारी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी घेतला.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत भाजप, शिंदसेना आणि उबाठा शिवसेना यांच्यात तिरंगी सामना होणार असून काट्याची टक्कर होणार असल्याचे संकेत मिळत आहे. तीनही पक्षातील नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते जोमाने कामाला लागले असून हिंगोलीकर कोणाला मतदान करावे या संभ्रमात आहेत. तीनही पक्षांनी साम, दाम, दंड, भेद याचा वापर या निवडणुकीत केला असून ही निवडणुक आ. संतोष बांगर, आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनी प्रतिष्ठेची केली आहे.

या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर तसेच भाजपचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा होणार आहे. यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आदिवासी विकासमंत्री अशोक ऊईके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महायुतीतील शिंदेसेनेच्या रेखा श्रीराम बांगर या नगराध्यक्षदाच्या निवडणुकीत आहेत. महायुतीतील दोन्ही पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकल्यामुळे निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. दोन्हीकडून आरोप प्रत्यारोप होत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेनंतर भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विजयाचा कोणता कानमंत्र देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून भाजपला मोठी ताकद मिळणार आहे. यावेळी अनेकांचा भाजप प्रवेशही होणार असल्याचे संकेत आहेत.

# भाजपला मत म्हणजे विकासाला मत- आ. तान्हाजी मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

आमची सत्ता नगरपालिकेवर येण्यापूर्वी रिसाला बाजार भागातील रस्त्यांवर जागोजागी खड्डे, अस्वच्छता, अतिक्रमणे होती. परंतु भाजपची सत्ता नगर पालिकेवर आल्यानंतर रिसाला बाजारातील गल्ली बोळात सिमेंट कॉंक्रीटचे रूंद रस्ते झालेत. अकोला बायपास ते रिसाला पर्यंत चौपदरीकरणाचे काम केले. आता रेल्वे पूलाचे काम सुरू करण्यात आले आहे. भाजपला मत म्हणजे विकासाला मत आहे. रिसाला बाजार हा भाजपचा सुरूवातीपासूनच बालेकिल्ला आहे. त्यामुळे येथील मतदार सुज्ञ असून भाजपच्या तीनही उमेदवारांना आणि नगराध्यक्षपदाच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर यांना विजयी करतील असा विश्वास आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केला.

रिसाला बाजार येथील भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. रामराव वडकुते, ॲड पप्पू सोनी, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, उमेदवार रिना गायकवाड, हमीद प्यारेवाले, अनिता गुठ्ठे, कैलाश शहाणे, वैशाली गोटे, जितसिंह साहू आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, या निवडणुकीत उमेदवार पळविणे, कोणाच्याही घरी जाऊन गळ्यात बळजबरीने रूमाल टाकणे, व्यापाऱ्यांना डोक्यावर हात ठेवायला लावणे आदी प्रकार घडत आहेत. शहरात जुगार, मटका, रेती माफीया निर्माण करण्याचे काम आ. संतोष बांगर यांनी केले. ज्या आमदाराने शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनमधून कितीतरी वर्षे अनधिकृतपणे शेतीला पाणी दिले, पिके पिकवली हे लोक शहराचा काय विकास करणार? अखेर विधानसभेत मी विषय लावल्यामुळे हे काम बंद केले. याउलट भाजपचा एकही पदाधिकारी व कार्यकर्ता अवैध धंदे करीत नाहीत. या निवडणुकीत विकासाला मतदान करा. अवैध धंदे आणि दादागिरी करणाऱ्यांना मतदानाच्या माध्यमातून जशासतसे उत्तर द्या असे आवाहन आ. मुटकुळे यांनी केले. लवकरच रिसाला भागातील सिरेहक शाह बाबा तलावातील गाळ काढून याठिकाणी सौंदर्यीकरण करण्याचे काम भाजप हाती घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून संविधानाची शपथ घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, समाज कल्याण अधिकारी श्रीमती गीता गुट्टे आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### जवळापळशी रोडवर अवैध वाळू ट्रॅक्टर पकडले



हिंगोली- तालुक्यातील अंधारवाडी शिवारात वाळूची अवैध वाहतुक करणारे ट्रॅक्टर निवडणुक पथकाने नाक्यावर पकडले. सध्या नगर पालिका निवडणुका असल्यामुळे एसएसटी पथकांकडून वाहनांची तपासणी सुरू आहे. बुधवारी सकाळी एक ट्रॅक्टर अवैधवाळू वाहतुक करीत असल्याचे कळताच पथकाने ट्रॅक्टर चालकास विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पथकाने तत्काळ तपासणी केली असता अवैध वाळू आढळली. यावेळी तीन मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या पथकाने ही कारवाई करीत ट्रॅक्टर ग्रामीण पोलिस ठाण्यात ट्रॅक्टर आणि अवैध वाळू जप्त केली आहे.

### बौध्द महासभेकडून संविधान दिन साजरा




हिंगोली- शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यापासून संविधान दिनानिमित्त बौध्द महासभेच्यावतीने रॅली काढण्यात आली. शहरातील इंदिरा गांधी चौक, महावीर चौक, गांधी चौक तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराणा, पूर्णाकृती पूतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर, वीणा खुराणा यांच्या बौध्द उपासक, उपासिका यांची उपस्थिती होती.

### दराडे विद्यालयात संविधान दिन साजरा

हिंगोली- येथील शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक डी पी डोईफोडे, अनिल लोळेवार, बी बी शिंदे यांची तर प्रमुख वक्ते म्हणून अर्जून कदम, शिक्षक टी एस खिल्लारे यांची उपस्थिती होती. यावेळी संविधानाबद्दल दोन्हीही वक्त्यांनी विद्यार्थ्यांना माहीती दिली तसेच सर्वांनी संविधानाची शपथ घेतली. संविधान अंगीकारण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# शेतकऱ्यांनी दलालांच्या आमिषाला बळी पडू नये- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

शेतकरी बांधवांनी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मूग उडीद व सोयाबीन खरेदी योजनेचा लाभ घेण्याकरिता कोणत्याही दलाल किंवा मध्यस्थांच्या अमिषाला बळी पडू नये. आपले मूग उडीद व सोयाबीन देऊ नये किंवा त्यांच्यामार्फत कुठलाही व्यवहार करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व एनसीसीएफ यांची यांची जिल्ह्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार एनसीसीएफमार्फत मूग उडीद व सोयाबीन खरेदीकरिता आढावा बैठक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी पणन महासंघाचे कुंडलीक शेवाळे, कृषी पणन मंडळाचे दिगंबर शिंदे, वखार महामंडळाचे व सीसीआयचे अधिकारी तसेच जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे ७ व महाराष्ट्र राज्य कृषि पणनच्या ११ खरेदी केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व एनसीसीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने हंगाम २०२५-२६ साठी हिंगोली जिल्ह्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार एनसीसीएफमार्फत मूग उडीद व सोयाबीन खरेदीकरिता शेतकरी नोंदणी दि.३० ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू करण्यात आली असून प्रत्यक्षात खरेदी प्रक्रिया पणन महासंघाकडून ७ खरेदी केंद्रावर दि.१५ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे. तसेच कृषी पणन मंडळाकडून २-३ दिवसामध्ये सुरू होणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले की, ज्येष्ठ शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर न येण्यासाठी सवलत आहे. मात्र त्यांनी प्रतिनिधी म्हणून आपल्या कुटुंबातील सदस्यामार्फत नामनिर्देशन करून शेतमाल जमा करावा. स्वत: शेतकरी नोंदणी करण्यासाठी शासनाने ई- समयमुक्ती अँपवर नोंदणी करावी. सर्वसाधारणपणे ३ दिवसात शेतकऱ्यांच्या शेतमालाचे पैसे त्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर जमा होतील. सर्व खरेदी केंद्रांना जास्तीत जास्त एसएमएस सोडून सोयाबीन खरेदी करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान केंद्र शासनाने मूग उडीद व सोयाबीन खरेदीकरिता मूग ८७६८ रुपये प्रति क्विंटल, उडीद ७८०० रुपये प्रति क्विंटल व सोयाबीन ५३२८ रुपये प्रति क्विंटल दर निश्चित केले आहेत. शेतकरी बांधवांनी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मूग उडीद व सोयाबीन खरेदी योजनेचा लाभ घेण्याकरिता आपल्या शेतमालाची (सरासरी दर्जा) नुसार नजीकच्या प्रतवारी केंद्रावरून प्रतवारी करून घेऊनच आपला एफएक्यू दर्जाचा शेतमाल खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणावा. ज्यामुळे शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी मदत होईल, असे सांगितले.

सोयाबीन साठी शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार पुढीलप्रमाणे फक्त एफएक्यू (सरासरी दर्जा) माती, काडी, कचरा व बाह्य पदार्थ डागी २ टक्के, चिमलेले, अपरिपक्व व रंगहीन-५ टक्के, कीड किंवा भुंगा लागलेले दाणे-३ टक्के, मशीनने तुटलेले, भेगा पडलेले-१५ टक्के व ओलावा-१२ टकके शेतकऱ्यांनी मूग उडीद व सोयाबीन विक्री करिता आपल्या गावाजवळील एनसीसीएफच्या नजीकच्या खरेदी केंद्रावर जाऊन किंवा एनसीसीएफने तयार केलेल्या ई-समयमुक्ती मोबाईल अँपवरून करावी. नोंदणीसाठी ई-पीक पाहणी केलेला सातबारा उतारा, आधारकार्ड व पासबुक घेऊन प्रथम आपल्या पिकाची नोंदणी करून घ्यावी. ही नोंदणी पॉस मशीनद्वारे करण्यात येणार असल्यामूळे प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. संपूर्ण खरेदीचा आढावा घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी खरेदीकरिता आपणास एसएमएस प्राप्त झाल्यानंतर शेतमाल खरेदी केंद्रावर घेऊन यावा व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सदरील योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

या आढावा बैठकीमध्ये वखार महामंडळाच्या गोदामामध्ये साठा साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे वखार महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच कापूस खरेदीचाही आढावा घेतला.

# शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालयात संविधान दिन साजरा





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

संविधान दिनानिमित्त विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालय आणि स्वयंसेवी संस्थांच्यावतीने संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्व ठिकाणी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करीत संविधानाची शपथ घेण्यात आली.

येथील जिल्हा परिषद कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांच्याहस्ते संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

शहरातील एबीएम इंग्लीश स्कुलमध्येही संविधान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष दिलीप बांगर, मुख्याध्यापक जोसेफ के जे, उपमुख्यध्यापक आदेश बोराळकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांची उपस्थिती होती सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक नितीन शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश व्यवहारे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रास्ताविक डॉ.प्रा.सचिन हटकर यांनी केले. त्यानंतर संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. प्रो. विलास आघाव यांनी पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजीवकुमार नरवाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र शाहू, पर्यवेक्षक धनंजय जोशी, अधीक्षक दिलीप दुबे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून लोकशाही, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांप्रती निष्ठा व्यक्त केली. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिरड शहापूर येथे बार्टीतर्फे संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २६ नोव्हेंबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथे आज दिनांक २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय शिरड शहापूर येथे संविधान दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमांमध्ये शिरड शहापूर चे सरपंच यशवंत जी रावले यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संविधान उद्देश पत्रिकेच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच बार्टी हिंगोली जिल्ह्याचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोंवदे साहेब व सायक आयुक्त कार्यालय, हिंगोली यांच्या आदेशान्वये समतादूत-सुकेश कांबळे, कार्यक्षेत्र औंढा नागनाथ. यांनी संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन केले. तसेच संविधानाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक गजानन अंतेवार यांनी केले. सदरील कार्यक्रमास ग्रामपंचायत चे सदस्य जयराम सूर्यतळ, शरद बीचेवार, बबन ढेंबरे, राजकुमार जैन, विश्वनाथ गायकवाड अनेक ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

# प्रस्थापिताबद्दलच्या असंतोषामुळे डॉ.ज्योती घुंबरेंच्या विजयाचे समीकरण बिघडणार!



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ नोव्हेंबर**

बीड नगर परिषद भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांना अचानक उमेदवारी दिल्याने निष्ठावंतामध्ये नाराजीचा सुर आहे. यांचे भारतीय जनता पक्षाचे कधीही काम केले नाही किंवा त्यांना भारतीय जनता पक्षा काय आहे याची कल्पना नसतांना त्यांना उमेदवारी मिळणे म्हणजे नशीब उघडल्यासारखे झाले आहे. राज्यात, देशात भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने मीच निवडूण येणार अशा अर्विभावत डॉ.ज्योती घुंबरे मतदारांना गृहीत धरून प्रचार करत असल्याचे दिसून येत आहे.



## बीड शहरामध्ये महिलांसाठी एकही स्वच्छतागृह नाही, शहरात रस्त्यावर कचऱ्याचे ढिग, रस्त्याची चाळण, अनियमित पाणी पुरवठा, पथदिवे बंद, व्यापारी संकुलात मुतरीची व्यवस्था नाही, शहरातील प्रमुख रस्त्यावर कुठेच मुतारी नसल्यामुळे व्यापाऱ्यांची अडचण, घंटागाडीचे नियोजन नाही, शहरातील धार्मिक स्थळांची दुरावस्था, शहरात अनेक अंतर्गत रस्ते नसल्याने नाल्याचे पाणी रस्त्यावर

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्यावर जनता कोणामुळे विश्वास ठेवणार यांच्याकडे काय व्हिजन आहे. त्यांना ज्यांनी आग्रहपुर्वक उमेदवारी देण्यास पक्षाला भाग पाडले त्यांच्यावर तरी बीडच्या जनतेचा विश्वास आहे का? विधानसभेमध्ये डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांचा पराभव झाला. त्याचे कारण नगर परिषद हेच होते. गेल्या ३५ वर्षापासून क्षीरसागर कुटूंबाकडे बीड शहराची सत्ता आहे. कधी पालकमंत्रीपद तर नगराध्यक्ष पद कायम त्याच कुटूंबाकडे बीडच्या जनतेने विश्वासाने सोपवले. मात्र त्यांनी शहराचा विकास करण्याऐवजी शहर बकाल केले. आजही बीड शहरामध्ये नियोजनाचा अभाव असल्याने नागरिकांना वेळेवर पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. शहरात स्वच्छतेचा अभाव, रस्त्याची दुर्दशा, सर्वात महत्वाची बाब म्हणजे बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लाडक्या बहिणी शासकीय कामासाठी व इतर कामासाठी शहरात येतात परंतु त्यांच्यासाठी स्वच्छता गृहाची कुठेच नगर परिषदने सुविधा केली नाही. एवढा मोठा विकासाचा अनुशेष असतांना डॉ.ज्योती घुंबरे यांना कोणाच्या विश्वासावर बीडकर मत देणार त्यांनी आपल्या डॉक्टर व्यवसायामध्येही फार काही गोरगरिब जनतेची सेवा केली असा ऐकवयास मिळत नाही. त्यांच्या व्यवसायाबद्दल लुटणारे डॉक्टर अशीच ख्याती आहे. भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते पक्षाचा आदेश मानून डॉक्टर घुंबरेंसाठी प्रचार करत आहेत. मात्र त्यांना फक्त हो म्हणले जाते मतदारांच्या मनामध्ये असणारी नाराजी बोलून न दाखविणे प्रत्यक्षात कृती करणे असाच मतदारांचा मनोदय असल्याचे दिसून येत आहे.जिल्ह्यामध्ये मंत्री पंकजा मुंडे यांनी अनेक ठिकाणी नगर परिषद निवडणुकीच्या माध्यमातून सभा घेतल्या, कॉर्नर बैठका घेतल्या आहेत. गेवराई, परळी वैजनाथ, धारूर, माजलगाव या ठिकाणी पंकजा मुंडे यांच्या प्रभावाने नगर परिषदा या भाजपाच्या ताब्यात येतील अशी परिस्थिती आहे मात्र बीडमध्ये क्षीरसागर यांची गेल्या ३५ वर्षापासून बीड नगर परिषदेमध्ये कायम सत्ता राहिली तरीही त्यांनी कुठलेच विकास कामे केले नाहीत. मग आज त्यांच्यावर विश्वास ठेवून बीडकर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार डॉ.घुमरे यांना मत देणार का? एकूणच नगर परिषद निवडणुकीची परिस्थिती बघता जनतेमध्ये क्षीरसागरांबद्दल असलेली नाराजी हेच भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्या पराभवाचे कारण असू शकते असे बोलले जात आहे. याच बरोबर निवडणुकीमध्ये विकास मुद्दे सोडून काही समाजकंठक ही निवडणूक जातीवर नेऊन ठेवत आहेत. मात्र बीडची सुजान जनता जातीय समीकरणे बाजूला ठेवून बीड नगर परिषदला सर्वसमावेशक व शहराच्या समस्येची जाण असणाऱ्या व्यक्तीच्या मतदार पाठिशी राहणार अशी परिस्थिती आहे. ना.पंकजा मुंडे यांना मानणारा मोठा वर्ग बीडमध्ये आहे. त्याच्या विश्वासावरच उमेदवार आपले विजयाचे गणित बांधत आहेत व जनतेला गृहीत धरून प्रचार चालू आहे. एकूणच डॉ.ज्योती घुंबरे या प्रभावहीन उमेदवार हीच मोठी अडचण होतांना दिसत आहे.

# टक्केवारी खाऊन राजकारण करणाऱ्यांच्या तोंडी शहराच्या विकासाची भाषा शोभत नाही-बाळराजे पवार

**भाजपच्या मेनरोड परिसरातील कॉर्नर सभेला तुफान गर्दी**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ नोव्हेंबर**

विकासाची भाषा करून,जनतेची दिशाभूल करणारे अमरसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवावे, तुम्ही केलेली एक चांगली पाणी पुरवठा योजना सुरू असलेली दाखवा, पोपटपंची करून विकासाच्या गप्पा मारता आणि टक्केवारी खाता तुमच्या तोंडात विकासाची भाषा शोभत नाही अशी खरमरीत टिका भाजप नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि. २५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कॉर्नर सभेत भाजप युवा नेते बाळराजे दादा पवार यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यावर आक्रमक आणि कडक शब्दात हल्ला चढवला. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गिताभाभी पवार तसेच प्रभाग क्रमांक ८, ९ व १० मधील उमेदवार सोनाली सुभाष सुतार, शहेदाद भाई आणि एजाज भाई सय्यद यांच्या प्रचारार्थ झालेल्या या सभेत ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजीमंत्री बदामरावजी पंडित, उमेदवार सौ.गीताभाभी पवार, रोहीत पंडित, प्रा.पी टी चव्हाण, अमोल करांडे, राजेंद्र राक्षसभुवनकर, सय्यद एजाज, शेख शेहदाद, कैलास माने, बबलू खराडे, महिला आघाडीच्या सौ.रत्नमाला मोटे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

या सभेत बोलताना बाळराजे पवार यांनी अमरसिंह पंडित यांच्यावर विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप करत कठोर शब्दांत समाचार घेतला. ते म्हणाले, विकासाची भाषा करणारे बीडचे अमरसिंह पंडित गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवू शकत नाहीत. एकही पाणी पुरवठा योजना योग्यरित्या सुरू नसताना विकासाची गप्पा मारणे म्हणजे जनतेची थेट फसवणूक आहे.

ते पुढे म्हणाले, पोपटपंची करू नका. विकासाची भाषा करता आणि मागच्या बाजूने टक्केवारी खाता. गेवराईच्या जनतेला दाखवायला तुमच्याकडे एकही भरीव काम नाही. तुम्ही गेवराईचे हित साधणारे नाही, तुम्ही लोकांची दिशाभूल करत आहात.

अमरसिंह पंडित यांच्यावर हल्ला चढवत बाळराजे पवार म्हणाले की, गेवराईत त्यांच्या नावाने विकासाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जातो; पण प्रत्यक्षात सुरू असलेले काम काहीच नाही. गावोगावी जनतेसमोर विकासाच्या गोष्टी सांगतात, पण दाखवायला एकाही प्रकल्पाची प्रगतीपथावरील स्थिती नाही. गेवराईला मागे टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या या ढोंग्यांना जनता ओळखते, असे ते म्हणाले.

# भारताचे संविधान जगात आदर्श-पो.नि.सुर्यतल

## सुंदरराव सोळंके महाविद्यालतात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ नोव्हेंबर**



शेजारील राष्ट्रात सत्तेविरुद्ध बंड होऊन त्यादेशात अस्तिरात निर्माण झाली परंतु भारतात विविध जाती, धर्म ,संस्कृती असताना संविधानामुळे भारत एकसंघ आहे. त्यामुळे जगात सर्वात मोठे लोकशाही असलेल्या भारताचे संविधान आदर्शवत आहे असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतल यांनी संविधान दिनानिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात बोलताना व्यक्त केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिना निमित्त व्याख्यान व संविधान एकता रॅली चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. के. सानप तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून पो. नि. राहुल सूर्यतळ होते यावेळी रेड रिबन क्लब प्रमुख शेख शहाबुद्दीन समुपदेशक , डॉ. एन. के. मुळे, डॉ. एम. ए. कव्हळे, प्रा. पवनकुमार शिंदे, प्रा. प्रकाश गवते, प्रा.एम. के. अलझेंडे, प्रा. स्वप्नील टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक केशव भोंडवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व संविधान उद्धेशिकेचे वाचन प्रा. संजय बागुल यांनी केले.सूत्रसंचालन रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे यांनी केले तर आभार प्रा. उमेश राठोड यांनी केले . कार्यक्रमाला प्राध्यापक, विध्यार्थी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथे संविधान दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ नोव्हेंबर**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. यंदाच्या उपक्रमाची थीम मेरा संविधान, मेरा स्वाभिमान अशी होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. तसेच उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ. उत्तम साळवे, NSS कार्यक्रमाधिकारी प्रा. राजपाल जाधव, प्रा. राम गव्हाणे, प्रा. दीपा देशपांडे, तसेच राज्यशास्त्र विभागाचे प्रा. श्रीधर आघाव हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच पंचप्राण तत्त्व यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.

# जन शिक्षण संस्थान बीड द्वारा संविधान दिन उत्साहात संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ नोव्हेंबर**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड व नानाजी देशमुख विद्यामंदिर, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दीनदयाल शोध संस्थान येथे संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

संविधान उद्धेशिका वाचन,भारतीय संविधानाचे महत्त्व आणि त्यातील तत्त्वे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी होत्या. प्रमुख वक्ते म्हणून ड. श्री. रणजीत वाघमारे तर श्री. गंगाधर जी देशमुख (संचालक, जन शिक्षण संस्थान, बीड) आणि मुख्याध्यापिका सौ. अर्चना मोराळे यांची उपस्थिती होती.ॲड. रणजीत वाघमारे यांचे सविस्तर मार्गदर्शन

प्रमुख वक्ते ॲड.रणजीत वाघमारे यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व आणि त्यातील मूलभूत तत्त्वे यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना त्यांनी संविधानाची निर्मिती आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारल्याच्या ऐतिहासिक दिवसाचे महत्त्व,२६ जानेवारी १९५० पासून संविधान अंमलबजावणी सुरुवात इत्यादींबाबत माहिती दिली. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून ते भारताच्या लोकशाहीचा आधारस्तंभ आहे, असे त्यांनी सांगितले.

मूलभूत हक्क संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क यांसारख्या मूलभूत हक्कांबद्दल माहिती दिली. नागरिकांनी आपल्या हक्कांप्रमाणेच कर्तव्यांबद्दलही जागरूक राहावे, असे आवाहन केले.न्याय, स्वातंत्र्य आणि समता संविधानाच्या उद्देशिकेत नमूद केलेले सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, तसेच विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य आणि दर्जा व संधीची समानता ही तत्त्वे त्यांनी स्पष्ट केली.संविधान निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बजावलेल्या अतुलनीय भूमिकेचे महत्त्व त्यांनी विशद केले आणि संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून ते सामाजिक क्रांतीचे माध्यम आहे, असे प्रतिपादन केले.जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक श्री. गंगाधर जी देशमुख यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी दीनदयाल शोध संस्थानच्या चित्रकूट, गोंडा, नागपूर, बीड आणि अंबाजोगाई येथील सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि संविधान दिनाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला.यानंतर चिरंजीव हर्ष एडके या विद्यार्थ्याने संविधान उद्देशिकेचे वाचन केले आणि उपस्थितांनी पाठीमागे सामूहिक म्हटले. ज्यामुळे कार्यक्रमात एक प्रेरक वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीडचे कार्यकर्ते, प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी, नानाजी देशमुख विद्यामंदिर बीडच्या शिक्षिका तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. जयश्री देशपांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'नमो मातृभूमी' या प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# महाराष्ट्राला सह्याद्री करण्याची थांबलेली प्रक्रिया पुन्हा सुरु करण्याचे काम यशवंतराव स्मृती समारोहामुळे होते-ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ नोव्हेंबर**

महाराष्ट्राला सह्याद्री करण्याची थांबलेली प्रक्रिया पुन्हा सुरु करण्याचे काम अंबाजोगाईच्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहामुळे होते असे मत साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख यांनी केले.

येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उद्घाटक म्हणून श्रीकांत देशमुख बोलत होते. प्रारंभी श्रीकांत देशमुख यांचा शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन समितीचे अध्यक्ष सतीष लोमटे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले तर श्रीकांत देशमुख यांचा परीचय समितीचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांनी करुन दिला. यावेळी समितीचे सचिव दगडू लोमटे उपस्थित होते.




आपल्या विस्तारीत भाषणात श्रीकांत देशमुख पुढे म्हणाले की, आजची संध्याकाळ ही मला यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराने , आठवणीने अस्वस्थ करणारी संध्याकाळ आहे. १९८२ साली जालना येथील विश्रामगृहावर यशवंतराव चव्हाण यांची भेट घेण्याचा योग मला आला होता. तेंव्हा यशवंतरावासोबत कोणीही नव्हतं अशी माहिती मिळाली होती. त्यामुळे ही भेट सहज होणारी होती. पण काही कारणांमुळे मला भेट घेता आली नाही.

अंबाजोगाई ही मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी आहे, मराठवाड्याचे संस्कृतिक केंद्र आहे या ओळखी पेक्षा मराठीचा पहिला कवी मुकुंदराज हा अंबाजोगाईचा आहे ही ओळख महत्वाची आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या बद्दल बोलताना जरा जबाबदारीनेच बोलावं लागतं. यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असलेली किंबहुना त्यांनी सुरु केलेली राजकीय संस्कृती आज कोणत्या डोंगर झाडीत अडकुन पडली आहे हे शोधणं हा आता चिंतनाचा विषय आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या एकुण लेखनातून त्यांचा विचार हा सतत समाजासमोर येत रहातो. सांस्कृतिक सत्ता ही सर्वहाराची, सर्वसामान्यांची सत्ता आहे. शेती हा व्यवसाय न रहाता तो उद्योगांमध्ये परीवर्तन झाले पाहिजे असे यशवंतराव चव्हाण सतत सांगत.शेतीचे सुत्र सांगणा-या छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांच्या भारत देशात दररोज १० शेतकरी आत्महत्या करतात ही शोकांतिका आहे असे त्यांनी सांगितले.